सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, ०८ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १९६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## देवाभाऊ जो बोलता हैं, वो जरुर करता हैं। आर जो नही बोलता हैं, औंर तो डेफिनेट करता हैं

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांचा मंगळवेढ्यातील सभेतून विरोधकांना गर्भित इशारा

तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर

मंगळवेढा,दि.७ आँक्टोंबर – तुम्ही मला एक आमदार दिला आणि मी सरकारचा करेक्ट कार्यक्रम केला. त्यामुळे एक लक्षात ठेवा देवाभाऊ जो बोलता है, वो जरुर करता है । और जो नही बोलता है, ओ तो डेफिनेट करता है असा गर्भित इशारा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना दिला.

पंढरपूर – मंगळवेढा मतदार संघातील विविध विकास कामांचा शुभारंभ आणि लोकार्पण सोहळ्याचा कार्यक्रम फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी (ता.७) मंगळवेढा येथे पार पडला. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आ.सुभाष देशमुख, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.राजाभाऊ राऊत, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, पाणी पुरवठा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दीपक कपूर, माजी आमदार राम सातपुते, शहाजी पवार, चेतनसिंह केदार ,नागेश डोंगरे, विजयसिंह देशमुख आदीं पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री फडवणीस म्हणाले, समाधान आवताडेंच्या प्रचारा करीता मधल्या काळात इथे मी आलो होतो. त्यावेळी मी आपणाला दोन आश्वासन दिल्याची आठवण त्यांनी करुन दिली. मला १०६ वा आमदार द्या, सरकारचा करेक्ट कार्यक्रम करतो असे एक आश्वासन मी दिले होते.तुम्ही मला आमदार दिला आणि मी सरकारचा करेक्ट कार्यक्रम केला.महाविकास आघाडीचे सरकार घालवुन आपले सरकार, म्हणजेच महायुतीचे, मुख्यमंत्री शिंदेच्या नेतृत्वा खालील सरकार आणले. दुसरे आश्वासन मंगळवेढा उपसासिंचन योजनेव्दारे २४ गावांना पाणी देण्याचे आणि आज हे देखील पुर्ण केले. पंढरपूर मंगळवेढा मतदार संघातील मतदारांनी एक मत समाधानला दिले त्यामुळे समाधानाने आज आपले समाधान केले असे सांगुन आजचा हा कार्यक्रम समाधान आवताडे या पाणीदार आमदारामुळेच संपन्न होत असल्याचे त्यांनी आवर्जुन सांगितले.

या बरोबरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सोलापूर आणि सांगली जिल्ह्यातील दुष्काळ आपण भूतकाळ करुन दाखविन, कायमचा संपवुन दाखविन असे सांगितले होते. त्या प्रमाणे महायुती सरकारने केंद्र सरकारच्या मदतीने या तीनही जिल्ह्यातील दुष्काळ संपविला आहे. सातारा जिल्ह्यातील ज्या गावांना दुष्काळी म्हणून संबोधले जायचे तो भाग आता दुष्काळी राहिलेला नाही. या प्रमाणेच सांगली जिल्ह्यात देखील टेंभु, म्हैसाळ योजनेची रखडलेली कामे मार्गी लावली. त्यामुळे तिथेही पाणी पहायला नसलेल्या तालुक्यांना पाणी दाखविले. सोलापूर जिल्ह्यात देखील सांगोला तालुक्यातील ५० हजार एकर जमीन ओलिताखाली आणली.लवकरच मंगळवेढा तालुक्यातील १७ हजार हेक्टर जमीन पुर्णपणे ओलिताखाली आणतो आहे. पाटाचे नाही तर पाईपव्दारे पाणी शेतात नेऊन ठिबक सिंचनाव्दारे थेंबना थेंब पाणी पिकासाठी दिले. त्यामुळे आज परिवर्तन झाल्याचे त्यांनी सांगितले.

फडणवीस म्हणाले, या बरोबरच शेतीसाठी लागणारी विज देखील आपल्या महायुती सरकारने माफ केली. ऐवढ्यावरच आम्ही थांबलो नाही तर येत्या काळात शेतीसाठी लागणारी वीज देणारी देशातील पहिली विज वितरण कंपनी देखील आपण आपल्या राज्यात उभी करतो आहे. या विज वितरण कंपनीव्दारे लवकरच शेतीला दिवसा १२ तासाची वीज उपलब्ध करुन देणार आहोत. त्यामुळे रात्रीच्यावेळी शेतकऱ्यांना शेतात जाण्याची गरज पडणार नाही. या विज वितरण कंपनीव्दारे युनीट मागे राज्य सरकारचे तीन रुपये वाचणार आहेत. त्यामुळे सरकारचे दहा हजार कोटी रुपयांची बचत होणार आहे.

### पाण्यामुळे होते जीवनात परिवर्तन

खऱ्या अर्थाने लोकांच्या,जीवनात परिवर्तन करावयाचे असेल तर पाणी हे अतिशय महत्वाचे आहे. कारण पाण्यामुळे शेती पिकते, पाण्यामुळे उद्योगधंदे येतात, पाण्यामुळे रोजगार मिळतो. जर शेतकऱ्यांना पाणी मिळाले तर त्यांच्या जीवनात खऱ्या परिवर्तन होवून त्यांचे जीवनमान उंचावते. त्यामुळे आपण लोकांच्या घरा पर्यंत, शेतापर्यंत पाणी पोहचविले, दुष्काळी गावे पाणीदार केली असेही फडणवीस यांनी सांगितले.










72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE | pine labs PAY LATER | HDFC BANK

*नियम आणि अटी लागू. *ऑफर फक्त निवडक मॉडेल्सवर. ऑफर 15 नोव्हेंबर 2024 पर्यंत उपलब्ध. बजाज ऑटोने कोणतीही पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. ₹10,000 पर्यंत *बचतीमध्ये मॉडेलवर आधारित ₹5000* कॅशबॅक आणि ₹5000* एचडीएफसी कार्ड कॅशबॅकचा समावेश. एक्सपर्ट्सने प्रोफेशनल सुपरविजन अंतर्गत नियंत्रित आणि बंद वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यांपासून इतर स्थानावर साहसी कृती केली आहे. ह्या साहसाचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे नियम आणि सुरक्षिततेचे नियम पाळा. विशिष्ट मॉडेल्स आणि विशिष्ट राज्यात एएमसी उपलब्ध. अधिक माहिती बजाज डीलरकडून मिळवा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षाने दिली आहे आणि त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे. कॅशबॅक ऑफर 15 ऑक्टोबर 2024 पर्यंत फक्त पाइन लॅब्स मशिन्सद्वारे एचडीएफसी क्रेडिट कार्डांच्या ईएमआय व्यवहारांवर उपलब्ध आहे. ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवरील ऑफर्स त्यांच्या नियम आणि अटींच्या अधीन आहेत.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Navale Bajaj 9130609999, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031. **Authorised Service Centre: Paithan** 9850823363, **Bidkin** 9881341213, **Vaijapur** 9422854982, **Lasur 9527771795**, **Gangapur 9423940806**, **Shivoor** 9850709785, **Mahalgaon 9284755116**, **Soygaon** 8956111154, **Phulambri** 7588075675, **Karmad** 9881159432, , **Pishore** 9130646246 **Bhokardan** 9923485831, **Georai** 8698568509, **Majalgaon** 9422380842, **Kaij** 9423715751, **Ambajogai** 9607091874, **Patoda** 9423471895, **Ashti** 7840900444, **Ambad** 9834910719, **Rajur** 8275333360, ,**Walsawangi** 8275855491, **Partur** 9112649438 , **Ausa** 8149542017 **Murud** 9860351229, **Chakur** 9049746161, **Renapur** 9881951011, **Omerga** 9890521818, **Paranda** 9421212280, **Kallamb** 8329268718, **Kinwat** 9527257525, **Mukhed** 9579194868 , Umri 8149815921, Narsi 9860069635 **Bhokar** 9423139732, **Mahur** 96089073034 ,**Malegaon** 9403746580,**Vasmat** 9890173708, **Sengaon** 9762427999, **Jawala Bazar** 9890989138, **Pathri** 9860907003, **Palam** 9763385151, **Selu** 7499441540, **Gangakhed** 9421859114, **Ranisawargaon** 8668727630. **Khamgaon** 9921479013, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060 **Akole** 9881939099, **Alephata** 7507571715, **Ashwi** 8888201059, **Ghargaon** 9970302801,**Manchar** 9890014697, **Narayangaon** 9850112036, **Sakur** 9422146709, **Talegaon Dighe** 9970886986, **Nighoj** 9850224992, **Kotul** 9921583946, **Ottur** 8007000790, **Shevgaon** 9067893709, **Loni** 7709387085, **Ghodegaon** 7588030777, **Sonai** 7588603005, **Newasa** 9527554555, **Kukana** 7588079959, **Rahata** 9881239140.

# शिंदे सरकारने सामान्य जनतेच्या हिताचे निर्णय घेतले : पालकमंत्री अब्दुल सत्तार

सिल्लोड प्रतिनिधी : राज्यात मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सामान्य जनतेच्या हिताचे व जनकल्याणकारी अनेक योजनांचे निर्णय घेतलेले आहे. बहुतांश योजना शुभारंभ सोहळ्याचे आयोजन करण्याची संधी मुख्यमंत्र्यांनी सिल्लोड - सोयगाव मतदारसंघाला व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याला दिल्याने काम करण्याची आधीकची संधी मिळाल्याचे मत पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी छत्रपती संभाजी नगर येथील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना वचनपूर्ती सोहळा महिला सशक्तिकरण मेळाव्याला उपस्थित लाभार्थी महिलांशी संवाद साधताना व्यक्त केले.



मुख्यमंत्री माझ लाडकी बहीण योजनेचा शुभारंभ व लाभार्थ्यांच्या खात्यावर लाभाची रक्कम टाकण्याचा शुभारंभ तसेच प्रत्यक्ष अंमलबजावणी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सिल्लोड येथे ०२ ऑगस्ट रोजी करण्यात आली होती. मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण या योजनेचा वचनपूर्ती सोहळा व महिला सशक्तिकरण मेळावा आयोजन करण्याची संधी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी छत्रपती संभाजीनगर येथे देवून पालकमंत्री अब्दुल सत्तार यांना पुन्हा एकदा आपल्या कामाची व जिल्ह्यातील लोकांशी संपर्क साधण्याची एक अधिकची संधी प्राप्त करून दिली. राज्यात सर्वाधिक जिल्ह्यातील ९ लाख ५२ हजार ९८५ महिला लाभार्थ्यांच्या खात्यात ॲडव्हान्स मध्ये नंबर महिना पर्यंत ५ महिन्यांचा ७ हजार ५०० रुपयांचा लाभ लाडक्या बहिणींच्या खात्यात वर्ग करण्यात आल्याने मनाला समाधान व कामासाठी ऊर्जा मिळाली आहे. असे प्रतिपादन पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी लाभार्थ्यांची संवाद साधताना केले.

महिला लाभार्थ्यांची संवाद साधताना मंत्री श्री सत्तार पुढे म्हणाले की, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी राज्यातील महिलांचे आर्थिक सशक्तीकरण उन्नतीच्या दृष्टीने अनेक निर्णय घेतले. मुलींना केजी टू पीजी शिवाय मेडिकल, इंजिनिअरिंग व व्यावसायिक शिक्षणाची मोफत शिक्षणाचा ऐतिहासिक निर्णय घेतला. कर्मचारी व कामगार यांच्यासाठी किमान निवृत्तीवेतनाची योजना लागू केली. शेतकऱ्यांसाठी शून्य वीजपंप बिल योजना कृतीत उतरवली. सर्व महिला व जेष्ठ नागरिकांना एसटी ५० टक्के सवलत तर ७५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवास सवलत सुरू केली. अंगणवाडी सेविका मदतनीस, आशा वर्कर्स, आरोग्य सेविका यांच्या मानधनात वाढ केली.

या प्रमाणे अशा अनेक योजना मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने राज्यातील जनतेच्या मनात स्थान निर्माण करून आपले कर्तव्य पार पाडले आहे. काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या विधानसभा निवडणुकीत मताच्या आशीर्वाद महायुतीच्या उमेदवारांना द्यावा असे आवाहन पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी मेळाव्यात केले.

## बारावीच्या विद्यार्थीनीचा विहिरीत पडून मृत्यू



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि. ७ ऑक्टोबर पैठण तालुक्यातील पाडळी येथील बारावीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या मुलीचा पाय घसरून विहिरीत पडल्याने मृत्यू झाला.

सविस्तर माहिती अशी की पाडळी येथील पूजा सुरेश हुड वय १८ वर्ष रा. पाडळी शाळेकरी मुलगी सकाळी १०:३० वाजता शेतात गेली असता शेता जवळील शेती गट नंबर १४२ मधील विहिरी जवळ असलेल्या पेरूच्या झाडाजवळ चप्पल आढळून आल्याने नातेवाईकांनी या घटनेची माहिती बिडकीन पोलिसांना दिली असता पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्यासह बीट जमादार एस एस कदम घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता विहीर पाण्याने पूर्ण भरलेली असल्याने , पूजाचा विहिरीमध्ये शोध घेणे अवघड असल्याने, छत्रपती संभाजीनगर येथून अग्निशामक पथक मागवण्यात आले होते, अग्निशामक दलातील जवानांनी पूजा हुड हिला विहिरीतून पाण्याबाहेर काढून पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले, पुढील उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय बिडकीन येथे दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रणिता मात्रे यांनी तपासून मृत घोषित केले व शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले, पूजा झाडावर पेरु तोडण्यासाठी गेली असता जवळ असलेल्या विद्युत तारेचा शॉक लागून केव्हा पाय घसरून विहिरीत पडल्याचा अंदाज नातेवाईकांनी सांगितले, पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अशोक माने बीट जमादार एस एस कदम करीत आहे.

## नात्यांमधील विश्वास, एकत्र कुटुंबपद्धती आनंदी वैवाहिक जीवनासाठी पूरक - डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी

### 'ब्रह्मसखी'तर्फे ब्राह्मण उपवधू-वरांचा 'प्रत्यक्ष संवाद'



पुणे: केवळ सौंदर्य, चांगले वेतन किंवा श्रीमंती नव्हे, तर नात्यांमधील विश्वास, सुसंस्कृतपणा आणि एकत्र कुटुंबपद्धती आनंदी वैवाहिक जीवनासाठी पूरक असते. एकमेकांना सांभाळून घेत, मने जुळली, तर पती-पत्नीचे नाते घट्ट होते. दोघांनीही एकमेकांचा सन्मान करत नाते, करिअर फुलवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे मत युरोकूल हॉस्पिटलच्या संचालिका, प्रसिद्ध लॅप्रोस्कोपिक तज्ज्ञ डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

ब्रह्मसखी ब्राह्मण महिला वधुवर मंडळातर्फे खास उपवधू-वरांसाठी 'प्रत्यक्ष संवाद' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कर्वेनगर येथील घरकुल लॉन्समध्ये झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी व 'देणे समाजाचे' संस्थेच्या प्रमुख वीणा गोखले यांच्या हस्ते झाले. प्रसंगी 'ब्रह्मसखी'च्या संचालिका नंदिनी ओपलकर, गीता सराफ, ज्योती कानोले, तृप्ती कुलकर्णी उपस्थित होत्या. ३५० मुले व १४० मुली असे ४९० विवाहेच्छूक वधू-वर यामध्ये सहभागी झाले होते.

डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी म्हणाल्या, विवाहावेळी सांसारिक जीवनाच्या कल्पना स्पष्ट असाव्यात. योग्य वयात विवाह, अपत्य आणि त्यांचे नेटके संगोपन व्हायला हवे. अलीकडे मूल होऊ न देण्याचे, घटस्फोटाचे प्रमाण वाढले असून, ही चिंतेची बाब आहे. सासू-सासऱ्यांना आईवडिलांप्रमाणे मानून त्यांच्या मनात जागा केली, तर संसार सुखाचा होतो. घरात आजी-आजोबा असतील, तर कुटुंब सुखी राहते. सुखदुःखात आपली माणसे उपयोगी येतात. त्यामुळे वेगळे राहण्याचा विचार करू नये. वीणा गोखले म्हणाल्या, ब्रम्हसखी समाजासाठी काम करतेय याचा आनंद आहे. तरुण वयातील मुलामुलींचे विवाह होणे अवघड होत चालले आहे. अशावेळी लग्नाळू मुलामुलींना समोरासमोर आणून आपला जीवनसाथी निवडण्याची संधी देण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. लग्नानंतर दोघांनीही घरात 'सपोर्ट सिस्टीम' उभारावी. उतारवयात 'शेअरिंग, केअरिंग'साठी अनेकांना जोडीदार हवा असतो. तेव्हा पन्नाशीनंतरच्या एकल लोकांसाठीही पुढाकार घ्यावा.

## येत्या मार्च महिन्यापर्यंत मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ ताब्यात घेणार : आ. प्रशांत बंब

### गंगापूर तालुक्यात प्रचाराचा शुभारंभ; नऊ हजार कामगारांना संसार उपयोगी भांडी संच वाटप

तभा. वृत्तसेवा

गंगापूर दि.६ ऑक्टोबर :

जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान करणाऱ्या शिक्षकांविरोधात मी आवाज उठवला त्या शिक्षकांना यांनी वैयक्तिक राजकारणासाठी पाठीशी घातले मला विद्यार्थी घडवायचा आहे. त्या उलट यांना पैसे कमवण्यासाठी शिक्षण संस्था वाचवायच्या आहेत.परंतु लक्षात ठेवा माझ्या मतदारसंघात येऊन माझ्या गोरगरीब जनतेला कोणी भूलथापा देऊन फसवेपणा करत असेल तर ते मी कदापि खपवून घेणार नाही. असा इशारा आमदार प्रशांत बंब यांनी दिला.



मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आमदाराने त्यांच्या १७ वर्षाच्या काळात केलेल्या कामाचा हिशोब जनतेसमोर मांडा नसता, मार्च महिन्यापर्यंत कायदेशीर रित्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ मी ताब्यात घेतल्याशिवाय राहणार नाही.माझ्या मतदारसंघात येऊन माझ्या गोरगरीब जनतेला कोणी भूलथापा देऊन फसवेपणा करत असेल तर ते मी कदापि खपवून घेणार नाही.

– आमदार प्रशांत बंब, गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदार संघ

लासुर स्टेशन येथून जवळच असलेल्या आरापूर शिवारात (दि. ५) शनिवार रोजी गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील पाच महत्त्वाच्या रस्त्यांची दर्जोन्नतीकरून त्यांना हायब्रीड एनईटी मॉडेल (क-च्) मधून सात अब्ज रुपये मंजूर करून घेऊन या रस्त्यांच्या कामाचे भूमिपूजन व नऊ हजार कामगारांना संसार भांडे वाटप करण्यात आली त्या प्रसंगी ते बोलत होते.

गंगापूर तालुक्यातील कसाबखेडा फाटा - पोटूळ -डोमेगाव ढोरेगाव रस्ता - एकुण लांबी २३ किमीसाठी १६४.८७ कोटी रुपये, देवगाव रंगारी - कायगाव टोका - एकुण लांबी ३३ किमी २२९ कोटी रुपये, माळीवाडा - आसेगाव आंबेगाव - एकलेहरा - कासोडा - आंबेलोहळ रस्ता एकुण लांबी १३ किमी ९१.४२ कोटी रुपये, काटेपिंपळगाव - वजनापूर - आंबेलोहळ - तुर्काबाद - लिंबे जळगाव रस्ता एकूण लांबी १६. २० किमी. ११८.१६ कोटी रुपये तर खुलताबाद तालुक्यातील चिकलठाण - लोणी - बाजार सावंगी - खुलताबाद फुलंब्री रस्ता एकुण लांबी १४.६० किमी ९५.५७ कोटी रुपये अशा एकुण सात अब्ज रुपये खर्च करून होणाऱ्या १०० किमी रस्त्याच्या अंतराच्या कामाचे भूमिपूजन आमदार बंब यांनी केले.

पुढे बोलताना आमदार बंब म्हणाले की माझ्या पंधरा वर्षाच्या काळात मी केलेली कामे माहिती पुस्तिकेच्या माध्यमातून गावागावात प्रत्येक ग्राम पंचायतला वाटप करणार आहे. परंतु तुम्ही १७ वर्षापासून मराठवाडा पदवीधर मतदार संघाचे आमदार आहात त्या काळात तुम्ही केलेल्या कामाचा हिशोब जनतेसमोर मांडा. पदवीधरांना बरबाद केले, जिल्हा परिषद शाळा बरबाद केल्या, ज्या शिक्षकांच्या विरोधात मी आवाज उठवला त्या शिक्षकांना यांनी पाठीशी घातले आणि या माध्यमातून स्वतःच्या संस्था बळकट केल्या. एवढेच नाही तर संस्थेत कामाला लावण्यासाठी शिक्षकांकडून ५० - ७० लाख रुपये घेऊन ठेवले. परंतु त्यांना अद्याप नोकरी दिली नाही. परंतु यापुढे असे होणार नाही. कुवतीप्रमाणे मोफत नोकऱ्या मिळतील. येत्या मार्च महिन्यापर्यंत कायदेशीर रित्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ मी ताब्यात घेतल्याशिवाय राहणार नाही असे ते म्हणाले.

दरम्यान यावेळी नऊ हजार कामगार कल्याण संसार भांडी वाटप लाभ धारकांना करण्यात आली.

## फॉरएव्हर न्यूद्वारे तृप्ती डिमरीची नवीन जागतिक ब्रँड दूत म्हणून घोषणा

पुणे : फॉरएव्हर न्यू या मेलबर्नमधील महिलांच्या प्रिमियम फॅशन ब्रँडला, बॉलिवुड अभिनेत्री तृप्ती डिमरी हिची नवीन जागतिक ब्रँड दूत म्हणून घोषणा करताना अतिशय आनंद होत आहे.पडद्यावरील आकर्षक वावर व सहज शैलीसाठी ओळखली जाणारी तृप्ती, फॉरएव्हर न्यूचे भारत, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, दक्षिण आफ्रिका, व यूरोप यासह महत्त्वाच्या बाजारपेठांमध्ये प्रतिनिधित्व करेल. तिचे तजेलदार, बिनधास्त व तारुण्यसुलभ चैतन्य फॉरएव्हर न्यूला अभिप्रेत असलेल्या ग्राहकांना- म्हणजेच तरूण, फॅशनच्या बाबतीत नेहमीच अग्रेसर असलेल्या महिलांना हमखास आपलेसे वाटेल, ज्यांच्यासाठी अभिजात लावण्य व अत्याधुनिक शैली लाख मोलाची आहे. तृप्तीची ट्रेंडला धरून असलेली फॅशन जाणीव व तरुणाईशी संवाद साधण्याची हातोटी यामुळे ती या ब्रँडसाठी अतिशय चपखल निवड आहे, जी फॉरएव्हर न्यूच्या कालातीत सभ्यपणा आणि अत्याधुनिक दिमाखाची सांगड घालण्याच्या स्वभावाला अगदी साजेशी आहे. तिच्या प्रभावामुळे ब्रँड अधिकाधिक ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल व अग्रणी फॅशन ब्रँड म्हणून असलेले स्थान अधिक बळकट होईल.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी कि. अर्ज क्र. १३६/२०२४

अर्जदार - १) विकास पितांबर चव्हाण वय-३५ वर्षे, धंदा-शेती
२) प्रकाश पितांबर चव्हाण वय ३० वर्षे धंदा-शेती
३) सत्रीबाई पितांबर चव्हाण वय ७० वर्षे धंदा-शेती
सर्व रा. नांदगाव तांडा ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छ. संभाजी नगर)
४) ललिता तुकाराम राठोड वय - ३७ वर्षे धंदा-शेती बोरमाळ तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद
५) सुरेखा शांताराम राठोड वय-३९ वर्षे धंदा-शेती रा. वरसाडा तांडा ता. पाचोरा जि. जळगाव

// विरुध्द // गैरअर्जदार - निरंक

अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की. उपरोक्त अर्जदारानी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे मयत नामे पितांबर धनसिंग चव्हाण यांचा मृत्यु दिनांक ३०/०३/२०२४ ला मौजे नांदगाव तांडा ता. सोयगाव जि औरंगाबाद (छ. संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारास शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे.

(पुढील दिनांकः ५/११/२०२४)

तरी, ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यानी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव ता. सोयगाव जि. औरंगाबाद

## टाटा पंचची सीएएमओ स्पेशल एडिशन लाँच

मुंबई : टाटा मोटर्स या भारतातील आघाडीच्या एसयूव्ही उत्पादक कंपनीने आज भारतातील पहिल्या क्रमांकाची सर्वाधिक विक्री होणारी कार टाटा पंचच्या स्पेशल, लिमिटेड पीरियड सीएएमओ एडिशन लाँच केली. आता ही एडिशन आकर्षक नवीन सीवीड ग्रीन रंगासह पूरक सफेद रंगाचे रूफ, आर१६ चारकोल ग्रे अलॉई व्हील्स आणि अद्वितीय सीएएमओ थीम पॅटर्न असलेले प्रीमियम अपहोल्स्टरीसह उपलब्ध आहे. या एडिशनमध्ये फर्स्ट-इन-सेगमेंट वैशिष्ट्ये देखील आहेत, जसे १०.२५-इंच इन्फोटेन्मेंट सिस्टमसह वायरलेस अँड्रॉइड ऑटो आणि ॲप्पल कारप्ले. या एडिशनमध्ये कम्फर्ट-टेक वैशिष्ट्ये देखील आहेत, जसे वायरलेस चार्जर, रिअर एसी वेंट्स व फास्ट सी-टाइप यूएसबी चार्जर आणि ग्रॅण्ड कन्सोलसह आर्मरेस्ट, जे टाटा पंचची साहसी क्षमता, प्रीमियम दर्जा आणि ड्रायव्हिंग अनुभवामध्ये अधिक भर करतात. ८,४४,९०० लाख रूपयांच्या (एक्स-शोरूम नवी दिल्ली) आकर्षक सुरूवातीच्या किमतीमध्ये उपलब्ध असलेली पंच सीएएमओ आता टाटा मोटर्स वेबसाइटवर बुक करता येऊ शकते.

## एमजीएमच्या ४५ विद्यार्थ्यांची परिसर मुलाखतीत निवड

छत्रपती संभाजीनगर, दि.७ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय, इन्स्टिटयूट ऑफ बायोटेक्नॉलॉजी आणि युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट ऑफ इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी या महाविद्यालयात शिकणाऱ्या अंतिम वर्षाच्या एकूण ४५ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये परिसर मुलाखतीच्या माध्यमातून निवड करण्यात आली आहे. निवड झालेले विद्यार्थी हे मेकॅनिकल, कॉम्प्युटर सायन्स, आयटी, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हील आणि एमसीए या विद्याशाखांतील आहेत.



विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण देत असताना त्यांना चांगल्या कंपनीमध्ये नोकरी मिळवून देण्यासाठी विद्यापीठाचा ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग काम करीत आहे. या विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि कौशल्य विकासासाठी सातत्यपूर्ण मार्गदर्शन केले जाते. समकालीन स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली कौशल्य विकसित करण्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्याख्यात्यांच्या संवाद सत्राचे आयोजन विभागाच्या वतीने करण्यात येते.

: डॉ. परमिंदर कौर धिंग्रा, विभाग प्रमुख, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग

शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मध्ये शिकणाऱ्या अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या ४५ विद्यार्थ्यांनी विविध नामांकित कंपन्यांमध्ये परिसर मुलाखती दिल्या होत्या. परिसर मुलाखतीच्या उपक्रमात आयटी, टेक्नॉलॉजी, टेलिकॉम, मेकॅनिकल आणि बायोटेक क्षेत्रातील यार्दी सॉफ्टवेयर प्रा.लि., ऋचा इंजिनियरिंग, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लि., शारदा इन्फोटेक, पीपीएस, युनाइटेड ब्रेवेरीज प्रा.लि., टेक अव्हेय इंटरप्रायजेस आदि नामांकित कंपन्या यामध्ये सहभागी झाल्या होत्या. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ३ ते ७.५ लक्ष रुपयांचे वार्षिक वेतन मिळणार आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी कि. अर्ज क्र. ११८/२०२४

अर्जदार - १) भिमराम ओंकार जाधव वय-६५ वर्षे, धंदा-शेती २) जगन ओंकार जाधव (मयत) अ) रजनाबाई जगन जाधव वय ६० वर्षे धंदा-शेती ब) समाधान जगन जाधव वय-३३ वर्षे धंदा-शेती क) सरला विजय बावीस्कर वय-२७ वर्षे धंदा-शेती वरील सर्व रा. माळेगाव (पिंप्री) ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छ. संभाजी नगर) ड) आशाबाई अनिल म्हस्के, वय-४५ वर्षे धंदा-मजुरी रा. कुऱ्हाड ता. पाचोरा जि. जळगाव इ) सोनाली नंदलाल बावीस्कर, वय-३० वर्षे, धंदा-मजुरी रा. कोटली निंभोरा तांडा, भडगाव जि. जळगाव ३) छगन ओंकार जाधव (मयत) अ) ठगुबाई छगन जाधव, वय-६५ वर्षे, धंदा-शेती ब) शंकर छगन जाधव, वय-४० वर्षे, धंदा-शेती क) दादाभाऊ छगन जाधव, वय ३८ वर्षे, धंदा-शेती वरील सर्व रा. माळेगाव (पिंप्री) ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छ. संभाजी नगर) ड) कांताबाई साहेबराव गायकवाड, वय-४२ वर्षे धंदा-शेती रा. खडकदेवळा ता.पाचोरा जि. जळगाव

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

अर्ज - वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की. उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे मयत नामे मयत नामे गुंताबाई उर्फ गुनाबाई ओंकार जाधव यांचा मृत्यु दिनांकः ०४/११/२०२२, जगन ओंकार जाधव हे दि. २९/०९/२०२१ ला व छगन ओंकार जाधव हे दि. ०२/०९/२०२३ ला सर्व मौजे माळेगाव (पिंप्री) ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छ) संभाजी नगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारास शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे

(पुढील दिनांकः २३/१०/२०२४)

तरी, ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यानी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०७/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव ता. सोयगाव जि. औरंगाबाद

## छत्रपती शाहू महाराज निबंध स्पर्धेत यश




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.७ ऑक्टोबर

तालुकास्तरीय आलेल्या राजश्री शाहू महाराज निबंध स्पर्धा घेण्यात आल्या.या स्पर्धा तीन गटात घेण्यात आल्या. यामध्ये अजंता व्हॅली इंग्लिश स्कूल सोयगाव येथील विद्यार्थी भावेश प्रशांत पाटील हा गट एक मधून नववा आला.तर गट दोन मधून कु.वैभवी रामजी ढगे नववी आली. या यशा बद्दल त्यांचे शालेचे संचालक डॉ. स्वाती पिंगाळकर, डॉ.दिनकर पिंगाळकर तसेच शाळा मुख्याध्यापिका रुपाली मानकर,शिक्षक वृंद रंजना जाधव,सीमा पाटील,सोनाली बागुल,प्रियंका रोकडे,पुजा दामोधर,उज्वला चौधरी,रुपाली गोल्हारे, मीनाक्षी रोकडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## महाराष्ट्र प्रदेश पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी राहुल पगारे यांची निवड



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०७ :- अखिल भारतीय राष्ट्रीय किसान परिषदेच्या वतीने संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अशोक पाटील हुड यांच्या सुचनेनुसार ऑल इंडिया नॅशनल फार्मर कौन्सिल सरचिटणीस उद्धव गायकवाड यांच्या स्वाक्षरीने अखिल भारतीय राष्ट्रीय किसान परिषदेच्या महाराष्ट्र प्रदेश पत्रकार परिषदेच्या अध्यक्ष पदी राहुल पगारे यांची निवड करण्यात आली. या निवडीबद्दल महिला परिषद अध्यक्ष श्रीमती कल्पना मोहिते, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष रविंद्र लांडगे,पत्रकार सोमनाथ शिंदे, संजय खडसन,तुषार नाटकर,राहुल गंगावणे, शुभम, बिडला,स्वप्नील पगारे, रोहन बनकर, सागर तांबे, अमोल मोटे, अजय पवार, संदिप ससाणे, सतिष तुसांबड,दिपक आव्हाड, भागचंद साळवे, अनिस सय्यद अदिंनी अभिनंदन केले.

## नवरात्री महोत्सव निमीत्त समोशरण विधानास ध्वजारोहणाने प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - छत्रपती संभाजीनगर शहाराच्या इतिहासामध्ये प्रथमच युगप्रवर्तक आदिनाथ दिगंबर जैन मंदिर अरिहंनगर येथे राष्ट्रसंत समाधीसम्राट आचार्य विरागसागरजी महाराज यांच्या मुल संघाचे सुशिष्य मुनिश्री १०८ विहीतसागरजी महाराज ससंघ यांच्या सानिध्यात नवरात्री महोत्सव निमीत्त दिनांक ०३ ऑक्टोंबर ते १२ ऑक्टोंबर पर्यत समोशरण विधानाचे आयोजन करण्यात आले असुन आज सर्व प्रथम सकाळी ११.३० वाजता दुपारी अरिहंतनगर जैन मंदिरा पासुन मित्र नगर येथे विराग सिंधु सभागृहात भव्य कळसाची शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी महिला डोक्यावर कळस घेवुन शोभायात्रेत पुढे चालत होत्या. तदनंतर १२.३० वाजता ध्वजारोहन करण्यात आले. तसेच १२.३० वाजता मंडप शुदी करण्यात आली. सकलीकरण व इंद्र प्रतिष्ठा १२.४५ वाजता करण्यात आली. भगवंताचा अभिषेक करण्यात आला. तदनंतर समोशरण महामंडळ विधान पुजन प्रारंभ करण्यात आले. सर्व प्रथम यावेळी समोशरण विधानाचे ध्वजारोहन विजयकुमार रमेशचंद चंद्रकुमार महावीरकुमार पाटणी परिवार यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी मंगलाचरण करण्यात आले.



विधानामध्ये सौधर्म इंद्र इंद्राणी होण्याचा मान सुरेखा राजकुमार सेठी परिवार यांना मिळाला तसेच चंद्रैवर्ती इंद्र इंद्राणी होण्याचा मान पुष्पादेवी विजय कासलीवाल, कुबेर इंद्र म्हणुन अर्पित राहुल दिलीप शहा परिवार, महायज्ञनायक राजकुमार विशाल शाह, यज्ञनायक उषादेवी बबनलाल चुडीवाल, इशान्य इंद्र प्रेरणा मनोज कासलीवाल, सानत इंद्र भावना भरत शाह, महेंद्र इंद्र सुशिलादेवी मोतीलाल रावका, ब्रम्हइंद्र छाया प्रकाशचंद गंगवाल, ब्रम्होत्तर इंद्र जयश्री सचिन लोहाडे, लांतव इंद्र अशोक उत्तमचंद पाटणी, शुक्रै इंद्र सारिका प्रकाशचंद पांडे, महाशुक्रै इंद्र ज्योती सतिश लोहाडे, सतार इंद्र राखी आनंदकुमार पांडे, सहत्रार इंद्र अनितादेवी सुरेंद्रकुमार गंगवाल, अनंत इंद्र मधु संदिप कासलीवाल, प्रणतइंद्र ज्योती संजय गंगवाल, आरण इंद्र जयश्री प्रमोद छाबडा, आच्युत इंद्र राणी विपीन कासलीवाल, कापिष्ठ इंद्र मिना राजकुमार अजमेरा आदी परिवारांना इंद्र इंद्राणी होण्याचा मान मिळाला.

यावेळी दुपारी ३ वाजता मुनिश्रींचे समोशरण महामंडळ विधानावर विशेष प्रवचन संपन्न झाले. तसेच संध्याकाळी आरती व शास्त्र वाचनाने कार्यकमाची सांगता करण्यात आली. यावेळी पंडीत अक्षय जैन यांच्या मार्गदर्शनामध्ये समोशरण विधान आयोजीत करण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# प्रियकर व पत्नीच्या संगनमताने पतीचा खुन; शेवगाव पोलीसांनी बारा तासात उघड केला गुन्हा

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ७ ऑक्टोबर जायकवाडी प्रकल्पामुळे पैठण तालुक्यात पुर्नवसित झालेले अहिल्यानगर जिल्ह्यातील विजयपूर (ब्राम्हणगाव) येथे प्रियकर आणि विवाहित प्रियसीने अनैतिक संबंधात अडसर ठरणारा पतीचा संगनमताने खुन केल्याचा गुन्ह्य शेवगाव पोलीसांनी उघड केला असुन पैठण, बिडकीन,भागातुन दोन्ही आरोपींना पोलीसांनी गजागाड केले आहे.या घटने संमंधी माहिती अशी की कृष्णापूर (ता.पैठण) येथुन काही महिन्यांपूर्वी विजयपूर गावातील विठ्ठल रखुमाई मंदिर परिसरात कुंटूबासह राहण्यास आलेल्या ज्ञानेश्वर पांडुरंग जाधव वय ३२ यांच्या पत्नीचे गावातील अनिल ज्ञानदेव जगदाळे वय २३ यांच्याशी प्रेमसंबंध जुळलेले होते. अनैतिक संबंधात पती अडसर ठरत असल्याने दि ४ शुक्रवार रोजी दुपारी ज्ञानेश्वर जाधव हा घरात आराम करित असताना पत्नी व प्रियकर अनिल जगदाळे, याने संगनमत करून अडथळाला ठरणारा ज्ञानेश्वर जाधव, यांच्या डोक्यात, हातावर, छातीवर लोखंडी गजाने मारहान करित गंभीर जखमी करुन जीवे ठार मारल्याची घटना घडली होती. या प्रकरणी मयताचे वडिल पांडुरंग बाबासाहेब जाधव वय ७७ यांनी या दोघांविरुध्द दि ५ शनिवार रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलीस निरीक्षक समाधान नांगरे, यांनी गु.रजि.नं. ८०१/२०२४ भा.न्या.सं.कलम-१०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करत या तपासासाठी दोन पथके बिडकीन,पैठण,व छत्रपती संभाजीनगर, भागात पाठवून वेगाने तपासाची चक्रे फिरवत, एका ठिकाणाहून आरोपी अनिल जगदाळे यास काही तासांतच,तर दुस-या ठिकाणाहून त्याची साथीदार आरोपी प्रियसीला पोलीस पथकाने १२ तासांच्या आत बिडकीन येथून ताब्यात घेत गुन्ह्याविषयी आरोपीला विश्वासात घेऊन विचारपुस केली असता आरोपीने खुनाचा गुन्ह्याची कबुली दिली असून आरोपीस अटक केली आहे. सदरची कारवाई अहिल्यानगर पोलीस अधिक्षक राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक प्रशांत खैरे, उपविभागिय पोलीस अधिकारी सुनिल पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. समाधान नागरे, सपोनि. सुंदरडे, फौजदार अमोल पवार, हवालदार नितीन भताने, नाकाडे, निलेश म्हस्के, किशोर काळे, पोना संभाजी धायतडक, शाम गुंजाळ, धाकतोडे, संतोष वाघ, राहुल खेडकर, प्रशांत आंधळे ,या टिमने तपास केला आहे या तपास साठी बिडकीन पोलिसांनी सहकारी केले





ज्ञानेश्वर पांडुरंग जाधव (मयत)

## 'कर्मयोगी आबासाहेब'मधून उलगडणार दिग्गज व्यक्तिमत्त्व


छत्रपती संभाजी नगर - वारकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या सर्वसामान्य कुटुंबात जन्माला येऊन सांगोला मतदारसंघातून गणपतराव देशमुख तब्बल ११ वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. तब्बल ५५ वर्षं त्यांनी या मतदारसंघाचं प्रतिनिधित्वं केलं. स्वर्गीय मा .गणपतराव देशमुख म्हणजेच ऊर्फ आबासाहेब यांचं जीवन आणि कार्य आता चित्रपटातून उलगडणार आहे. दमदार स्टारकास्ट असलेला कर्मयोगी आबासाहेब हा चित्रपट २५ ऑक्टोबरला मराठी आणि हिंदी भाषेत जगभर रिलीज होत आहे. या चित्रपटाचं पोस्टर सोशल मीडियावर नुकतेच लाँच करण्यात आलं आहे. मायका माऊली फिल्म प्रॉडक्शन आणि मुंबई क्रिएशन एंटरटेन्मेंटच्या मारुती तुळशीराम बनकर, बाळासाहेब महादेव एरंडे यांनी चित्रपटाची निर्मिती केली आहे. अल्ताफ दादासाहेब शेख यांनी चित्रपटाचं लेखन, गीतलेखन आणि दिग्दर्शन केलं आहे. अवधूत गुप्ते यांनी संगीत, कुमार डोंगरे यांनी छायांकन आणि संकलनाची जबाबदारी निभावली आहे.



## पुष्पाबाई राकडे यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.७ ऑक्टोबर - तालुक्यातील गोंदेगाव येथील पुष्पाबाई सुनील राकडे( वय.४८) यांचे सोमवारी सकाळी दहा वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पती,एक मुलगा,एक मुलगी असा परिवार आहे,मंगळवारी सकाळी नऊ वाजता त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.ते सोयगाव पंचायत समिती चे विस्तार अधिकारी सुनील राकडे यांच्या त्या पत्नी होत.



## सारंगधर सोहनी यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.७ ऑक्टोबर - शहरातील योगेश्वर नगर येथील रहिवाशी सारंगधर विश्वनाथ सोहनी (वय.६०) यांचे सोमवार रोजी सकाळी ८:०० वा.अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार रोजी दुपारी २:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात,पत्नी,एक मुलगा,एक मुलगी,सुन,नातवंडे,असा परिवार आहे.ते गोपाल सोहनी यांचे वडील होत.

## मुकुंदा देवीचा नवरात्र उत्सव उत्साहात
### पहाटेपासूनच महिला भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.७ ऑक्टोबर:

गंगापूर येथून सात किलोमीटर अंतरावर असलेल्या मांजरी गाव असून येथील खडकात स्वयंभू श्री मुकुंदा देवीचे मंदिर असून प्राचीन काळापासून या मंदिरात नवरात्र उत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे. या मंदिराची आख्यायिका अशी आहे की, पुरातन काळात मांजर्या नावाचा राक्षस होता तो ग्रामस्थांना त्रास देत असल्याने त्याचा वध करण्यासाठी देवीने येथे स्वयंभू अवतार घेऊन त्याचा वध केला. त्याकाळापासून मांजर्या नावाच्या राक्षसाचा वध केल्याने या गावाचे नाव मांजरी असे पडले आहे. असे मांजरी येथील गावातील नागरिक सांगतात.

घटस्थापनेपासून देवीचा नवरात्र उत्सवास प्रारंभ करण्यात येतो दसरा पर्यंत उत्सव सुरू असतो.पहाटेपासूनच गंगापूर व परिसरातील महिला ,पुरुष पायी देवीच्या दर्शनासाठी येत असतात.उत्सव काळात सकाळी, संध्याकाळी आरती भजन, कीर्तन आदी धार्मिक कार्यक्रम होत आहे. प्रत्येक मंगळवारी सकाळी ७ वाजता देवीची महाआरती होते . ग्रामस्थ पुजारी संतोष जोशी देवीची पुजाआरती करतात . दर्शनासाठी येणाच्या भाविकांना त्रास होऊ नये म्हणून मांजरी माहूली मंदिर विश्वस्त परीश्रम घेत आहेत. ९ आक्टोंबर ७ व्या माळेस सरला बेट चे मठाधिपती हभप रामगिरी महाराज यांच्या किर्तनानंतर महाप्रसाद संतोष अंबिलवादे व संदीप कुलकर्णी,नानासाहेब कसाने यांच्या कडून आयोजन करण्यात आले आहे. मंदिर प्रशासन आणि पोलीस प्रशासनाकडून योग्य पोलीस बंदोबस्त करण्यात आलेला आहे.



## डोंबिवलीचे आमदार आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण आयोजित महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सव नमो रमो नवरात्री

छत्रपती संभाजीनगर - मुंबई आणि महाराष्ट्रात डोंबिवलीचा नमो रमो गरबा आता फार प्रसिद्ध झाला आहे. सांस्कृतिक राजधानी म्हणून डोंबिवलीची कीर्ती सर्वत्र आहेच. पण गेली काही वर्ष नमो रमो नवरात्री या नावाने महाराष्ट्रातील सर्वात मोठा नवरात्री उत्सवही डोंबिवलीतच साजरा केला जातो त्यात जगप्रसिद्ध गरबा कलाकार येण्यास उत्सुक असतात. यंदा गरबा क्वीन या विशेषणाने संबोधली जाणारी गीताबेन रबारी पुन्हा एकदा नवरात्रीचे नऊ दिवस आपल्या नमो रमो नवरात्रीचा उत्सव रंगतदार करण्यास येणार आहे सोबत ख्यातनाम गरबा गायक

---

### जाहीर प्रगटन

**दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ३९/२०२३.

अर्जदार : १) मंगल रामदास इंगळे, ययः ४९ वर्षे, धंदाः शेती. २) दुर्गाबाई रामदास इंगळे, वय ७० वर्षे, नंदा घरकाम. वरील दोन्ही अर्जदार रा. जवळा (रवळा) ता. सोयगांव जि. औरंगाबाद, ३) लिलाबाई सुरेश सुरडकर, वय ४८ वर्षे, धंदाः शेती. रा. सावळदबारा ता. सोयगांव जि. औरंगाबाद ४) शिलाबाई प्रकाश सुरवाडे, वयः ४६ वर्षे, हांदा मजुरी, रा. बालगांव ता. जामनेर जि. जळगांव, ५) चंद्रकलाबाई अशोक लोखंडे, वय ५० वर्षे, धंदा मजुरी, रा. आर. टी. मोहता, कॉ. करूणा नगर, ०४ सिध्दीनाथ सुधार सोसायटी, एस. पी. रोड, पवई, मुंबई पिन कोड - ४०००७२. ६) निर्मलाबाई भिमराव लोखंडे, ययः ५१ वर्षे, धंदाः मजुरी, रा. मांडवे ता. जामनेर जि. जळगांव. ७) संगीताबाई अर्जुन सोनवणे, वय ४४ वर्षे, धंदाः मजुरी, रा. बिल्डींग नं. एफ रूम नं. २०४, श्रमीत नगर, ठाणे बेलापुर रोड, खारणे, एम. आय. डी. सी., नवी मुंबई. ठाणे, कोपर खैरणे, मुंबई. पिन कोड नं.:- ४००७०९.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज: वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. रामदास सोनु इंगळे यांचा मृत्यु दिनांकः १७/०१/२०२३ ला मौजे जवळा (रवळा) ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयतास वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. (पुढील दिनांक: २५/११/२०२४). तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : ७-१०-२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव, सोयगांव जि. औरंगाबाद

---

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.मू. नोंद/सी.आर /२०२४ दिनांक : १८/०९/२०२४,

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती कडू फकीरा काकडे रा. नेवरगांव ता. गंगापूर. जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय नेवरगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार आई नामे पार्वताबाई फकीरा काकडे यांचा मृत्यु दिनांक ३०/०३/२००७ रोजी मौजे नेवरगांव ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय नेवरगांव ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला मृत्यु नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल. आज दिनांक १८.०९.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक :- १८/०९/२०२४.
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.मृ.नोंद/सी.आर /२०२४ दिनांक : १८/०९/२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती कचरू रावसाहेब काकडे रा. नेवरगांव ता. गंगापूर. जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय नेवरगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार वडील नामे रावसाहेब रखमाजी काकडे यांचा मृत्यु दिनांक ०२/१०/२००७ रोजी मौजे नेवरगांव ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय नेवरगांव ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला मृत्यु नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १८.०९.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक : १८/०९/२०२४.
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

### जाहीर प्रगटन

**गा. दिवाणी न्यायाधीश क. रतर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: १२१/२०२४.

अर्जदार:- १) शशीकलाबाई प्रल्हाद रावळकर वयः ५५ वर्षे, धंदाः- शेती २) योगेश प्रल्हाद रावळकर वय- ३३ वर्षे घदा-शेती दोन्ही रा. फर्दापुरं ता.सोयगाव जि. औरंगाबाद (छ. संभाजीनगर) ३) सपना विकास हिवरांये वय ३० वर्षे धंदा घरकाम रा.वार्ड नं. ४ बोदवड ता. बोदवड जि जळगाव.

४) पुनम गंगेश गोतरकार वय २९ वर्षे धंदा-घरकाण रा. कुरांगड (खु) ता. जळगाव जामोद जि. बुलढाणा

विरुध्द

गैरअर्जदार निरंक

अर्जः वारा प्रमाणपत्र गिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. गहाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांर्व जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे-प्रल्हाद तुकाराम रावळकर यांचा मृत्यु दिनांक- १७/०७/२०२४ ला मौजे फर्दापुर ता सोयगाव औरंगाबाद (छ.संभाजी नगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे अर्जदारास शासकीय सवलतीसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे.

(पुढील दिनांक:- २४/१०/२०२४).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक:- ०३/१०/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगाव ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

---

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.१२६/२०२४

अर्जदारः-१) दिपक बाबुलाल सनन्से वय-४७वर्ष धंदा-शेती २) उषा सतीश बाविस्कर (शिंपी) वय-४० वर्ष धंदा-घरकाम रा. तितूर ता. सोयगाव जि. औरंगाबाद. ३) शैला अरुण शिंपी वय-४३ वर्ष, धंदा-घरकाम रा. नगरदेवळा ता.पाचोरा, जि. जळगाव ४) सीमा योगेंद्र खैरनार वय ३७ वर्ष धंदा-घरकाम रा.एन-३२-एन-५/४२/२, स्वामी विवेकानंद नगर, दत्त मंदिराजवळ, सिडको, नाशिक

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील कै. बाबुलाल महादू सनन्से यांचा दिनांक १७/०८/२०२३ रोजी वृद्धपकाळाने मौजे नाशिक ता. जि. नाशिक येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत कै. बाबुलाल महाद् सनन्से यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख १८/१०/२०२४. आज दि.५/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीकसहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

---

### जाहीर प्रगटन

**माननिय दिवानी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर न्याय न्यायालय गंगापूर**

सिविल एम ए क्र ४३४/२०२४
पू ता.२५/११/२०२४

अर्जदार. :- १) कचरू पिता रावसाहेब काकडे वय ४५ वर्ष धंदा शेती रा नेवरगाव, जि छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

विषय. :- वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत

ज्या अर्थी वरील अर्जदार यांनी ॲड. जी डी. सपकाळ यांच्यामार्फत वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज दाखल केला आहे की, असे की अर्जदारांचे वडील नामे रावसाहेब रख्माजी रखमाजी काकडे हे दिनांक ०२/०७/२००७ रोजी मौजे नेवरगाव ता गंगापूर जी छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच मयत रावसाहेब रख्माजी रखमाजी काकडे यांच्या पत्नी व अर्जदाराची आई नामे हौसाबाई रावसाहेब काकडे ह्या देखील दिनांक १०/१२/२०२३ मौजे नेवरगाव ता गंगापूर छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) येथे मयत झालेल्या आहे. असे की अर्जदार हा मयत रावसाहेब रख्माजी रखमाजी काकडे व हौसाबाई रावसाहेब काकडे यांचा मुलगा असून एकमेव कायदेशीर वारसदार आहे त्यांच्या व्यतिरिक्त मयत रावसाहेब रख्माजी रखमाजी काकडे व हौसाबाई रावसाहेब काकडे यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. अर्जदारास शासकीय व निम शासकीय कामासाठी मयतांच्या वारस प्रमाणपत्राची गरज आहे म्हणून अर्जदाराने सदरचा अर्ज मान न्यायालयात दाखल केलेला आहे. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की सदरील अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची काही हरकत आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्धीपासून ३० दिवसाच्या आत आपले आक्षेप उजर अथवा हरकत मा न्यायालयात लेखी स्वरूपामध्ये दाखल करावे, मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीनुसार त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

आज रोजी ७/१०/२०२४ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्या निशी देण्यात आले

सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापूर

---

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:-१३४/२०२४.

अर्जदार : १) संदीप सुभाष चव्हाण, वयः २६ वर्षे धंदाः- मजुरी, २) लक्ष्मीबाई सुभाष चव्हाण, वयः- ३२ वर्षे, धंदाः- मजुरी, दोघे रा. पळाशी ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे- सुभाश बाबुराव चव्हाण, यांचा मृत्यु दिनांकः- १७/०७/२०२१ ला मौजे पळाशी ता. सोयगाव जि.औरंगाबाद (छ. संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारास शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे.

(पुढील दिनांक:- २१/१०/२०२४

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक:- ०७/१०/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव. ता. सोयगांव जि. औरंगाबाद

---

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: १५३/२०२४.

अर्जदार : १) लताबाई प्रकाश तराळ, वयः- ६५ वर्षे, धंदाः- शेती. २) जगदीश प्रकाश तराळ, वयः- ४० वर्षे, धंदाः- शेती. ३) राहुल प्रकाश तराळ, वयः- ३५ वर्षे, धंदाः शेती. ४) नरेंद्र प्रकाश तराळ, वयः ३० वर्षे, धंदाः शेती. वरील सर्व अर्जदार रा. कवली ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

विरुध्द

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे- प्रकाश भागवत तराळ, यांचा मृत्यु दिनांकः- २३/०५/२०२४ ला मौजे कवली ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छ. संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारास शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे.

(पुढील दिनांकः- २५/११/२०२४).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- ०७/१०/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव. ता. सोयगांव जि. औरंगाबाद

---

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: १५५/२०२४.

अर्जदार : १) साबेराबी ईस्माईल खाँ (मेवाती) वय ६५ वर्षे धंदा-मजुरी. २) इसरील ईस्माईल पठाण (खों.) वय ३२ वर्षे धंदा-मजुरी ३) हुसेन खॉ. ईस्माईल खाँ. (पठाण) वय २८ वर्षे धंदा-मजुरी. ४) शाहरूख ईस्माईल मेवाती खाँ. वय २४ वर्षे धंदा-मजुरी वरील सर्व रा. वेताळवाडी ता. सोयगाव जि. औरंगाबाद. ५) सायराबी असलम पठाण, वर्षेः- २६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. सब्जीमंडी, जाधव वाडी, औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे- इस्माईल मनवर खॉ, यांचा मृत्यु दिनांकः ११/०७/२०२३ ला मौजे वेताळवाडी ता. सोयगाव जि.औरंगाबाद (छ. संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारास शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे.

(पुढील दिनांकः- २२/११/२०२४).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- ०७/१०/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव. ता. सोयगांव जि. औरंगाबाद

---

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. १४१/२०२४.

१. जमुनाबाई झामु राठोड, वय ७०, धंदा शेती, रा. मोहळाई, पोस्ट बनोटी ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. २. भाउलाला झामु राठोड, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ३. राजु झामु राठोड, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४. संजय झामु राठोड, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ५. ईश्वर झामु राठोड, वय ४६ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ६. सखुबाई धनराज चव्हाण, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. घोडेगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव. ७. सरलाबाई अजमल जाधव, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. बोढरे सांगवी, ता. चाळीसगांव, जि. जळगांव.

विरुद्ध
निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. स्वप्निल र सुरळकर, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत झामु लालु राठोड यांचा दिनांक २६/१२/२००८ रोजी मौजे मोहळाई येथे मृत्यु झ गालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १ ते ७ वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ७ हे मयत झामु लालु राठोड यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र दंण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक २७/०९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले असे. पु.ता. ६/११/२०२४

आदेशावरुन

विभागीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

---

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १०५/२०२४

अर्जदारः- १) लक्ष्मण बुधा राजपूत, वय-५२ वर्ष धंदा-शेती २) भरतसिंग बुधा राजपूत, वय-४९वर्ष धंदा-शेती १ व २ रा.पळाशी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. ३) छायाबाई उर्फ रुमकाबाई निमचंद भोपळे वय-६६ वर्ष धंदा-घरकाम रा. चारनेरवाडी, ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद ४) मायाबाई उर्फ निर्मलाबाई कपूरचंद परदेशी वय-५८ वर्ष धंदा-घरकाम रा. वडजी ता. भडगाव जि. जळगाव ५) मालताबाई उर्फ मालतीबाई रामभाऊ परदेशी वय-५३वर्ष धंदा. घरकाम रा.भडगाव ता. भडगाव जि. जळगाव

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरणः- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांची आई कै. कमलबाई बुधा राजपूत यांचा दिनांक २८/०९/२०२३ रोजी वृद्धपकाळाणे मौजे पळाशी, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत कै. कमलबाई बुधा राजपूत यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ५ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ५ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख २१/१०/२०२४. आज दि.५/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीकसहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

---

मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

### जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ११६/२०२४

अर्जदार-१) दिपचंद शिवलाल राठोड वय ४६ वर्षे धंदा शेती २) प्रेमसिंग शिवलाल राठोड वय ४८ वर्षे घदा शेती दोन्ही. रा. वरखेडी (बु) ता सोयगाव जि. औरंगाबाद (छ.संभाजी नगर) ३) नवसाबाई धारासिंग चव्हाण वय ४५ वर्षे धंदा शेती रा जंगलाताडा ता सोयगाव जि औरंगाबाद (छ. संभाजीनगर)

४) कौसल्याबाई भागचंद जाधव वय ५० वर्षे धंदा शेती रा. कुंभारी ता. जामनेर जि.जळगाव

// विरुध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, याच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे शिवलाल खाता राठोड यांचा मृत्यु दिनांकः- ०२/०२/२००५ ला व जनाबाई शिवलाल राठोड दि. २६/०८/२०११ ला दोन्ही मौजे वरखेडी (बु) ता. सोयगाव जि. औरंगाबाद (छ. संभाजी नगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारास शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे

(पुढील दिनांक: २३/१०/२०२४).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यानी हे जाहीर प्रगटनब्दार प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः-०३/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीकसहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगाव ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

# संपादकीय

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# विकृतीला चाप

सर्वोच्च न्यायालयाने दिलेला एक महत्त्वपूर्ण निर्णय 'पोर्नोग्राफी' प्रकरणांमध्ये कारवाईसाठी एक नवीन मानक बनू शकतो. या निर्णयानुसार 'चाईल्ड पोर्नोग्राफी' असलेला व्हिडीओ पाहिला, मोबाईल किंवा अन्य डिव्हाईसमध्ये सेव्ह केला तर तो 'पोक्सो' आणि 'आयटी' कायद्यानुसार गुन्हा ठरेल. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भातील मद्रास उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द केलाच; पण संभाव्य गुन्हेगारांनाही कडक इशारा दिला आहे. देशात आणि जगात इतक्या मोठ्या घडामोडी घडत असताना सर्वोच्च न्यायालयाने मागच्या आठवड्यात दिलेल्या एका महत्त्वाच्या निकालाकडे माध्यमांचे दुर्लक्ष झाले. सर्वोच्च न्यायालयाने पोर्नोग्राफीक व्हिडीओ फक्त माझ्या फोनमध्ये आहे, त्यामुळे इतरांना हानी नाही, असे एखाद्याचे म्हणणे असू शकते, परंतु हा गैरसमज काढून टाकला पाहिजे. असे व्हिडीओ चुकूनही मोबाईल, संगणक किंवा अन्य गॅझेटवर बघता, ठेवता येणार नाहीत. असे केल्यास कायदेशीर कारवाईला तोंड द्यावे लागेल, असा इशारा सर्वोच्च न्यायालयाने अलिकडील निवाड्यातून दिला आहे. या वर्षाच्या सुरुवातीला मद्रास उच्च न्यायालयाने एका व्यक्तीविरुद्धचा फौजदारी खटला रद्द केला होता. त्याच्या फोनमध्ये मुलांचे अश्लील व्हिडीओ आढळले होते. उच्च न्यायालयाने म्हटले होते की, केवळ व्हिडीओ बाळगणे हा 'पोक्सो' किंवा 'आयटी' कायद्यांतर्गत गुन्हा ठरत नाही. हा निर्णय खूपच चिंताजनक होता. कारण याने एक पळवाट निर्माण केली होती. त्यातून लोक फक्त या आधारावर सुटू शकत होते. त्यांनी बाल अश्लील व्हिडीओ व्हायरल केला नाही, ही पळवाट मिळत होती. मद्रास उच्च न्यायालयाच्या निकालाचाच तसा अर्थ होता. उच्च न्यायालयाचा हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने अलिकडे फेटाळून लावला आणि ही चूक गंभीर ठरवून सुधारली. आता आरोपीचा खटला तिरुवल्लूर जिल्ह्यातील महिला न्यायालयात चालवला जाणार आहे. मुलांचे लैंगिक शोषण कोणत्याही प्रकारे सहन करता येणार नाही, असा इशारा सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी दिला. आपल्याला एखाद्याकडून 'चाईल्ड पोर्नोग्राफी'चा व्हिडीओ मिळाला, तर पोलिसांना माहिती द्यावी लागणार आहे. ती न देणे हा गुन्हा ठरवण्यात आला आहे. एखाद्याने असा व्हिडीओ येताच काढून टाकला किंवा नष्ट केला नाही किंवा त्याची तक्रार केली नाही, तर 'पोक्सो' कायद्याच्या कलम १५ (१) अंतर्गत दंड भरावा लागेल. एखाद्याला अनोळखी व्यक्तीकडून लिंक मिळाली आणि त्या लिंकवर क्लिक केल्यावर फोनवर 'चाईल्ड पोर्नोग्राफी' व्हिडीओ दिसला, तर संबंधिताने ती लिंक ताबडतोब बंद केली तरी हा व्हिडीओ आपल्या मोबाईल किंवा संगणकामधून काढून टाकला, तरी या व्यक्तीने या घटनेची तक्रार करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास संबंधित व्यक्ती गुन्हेगार मानली जाईल, ही तरतूद महत्त्वाची मानली पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाने 'पोक्सो' कायद्याच्या कलम १५ चा सविस्तर अर्थ लावला आहे. या कायद्याच्या कलम १५ नुसार 'चाईल्ड पोर्नोग्राफी' पाहणे, बाळगणे किंवा प्रसारित करणे हा गुन्हा आहे. सर्वोच्च न्यायालयाने या कलमांतर्गत तीन प्रकारांच्या गुन्ह्यांचे वर्णन केले आहे. 'चाईल्ड पोर्नोग्राफी' हटवणे किंवा तक्रार न करणे हा गुन्हा आहे. कोणालाही 'चाईल्ड पोर्नोग्राफी' पाठवली, दाखवली किंवा पसरवली तर तोदेखील गुन्हा मानला गेला आहे. 'चाईल्ड पोर्नोग्राफी' विकण्यासाठी किंवा खरेदी करण्यासाठी उपलब्ध केल्यास तोदेखील गुन्हा आहे. २०१९ मध्ये 'पोक्सो' कायद्यात सुधारणा करण्यात आली आणि कलम १५(१), (२) आणि (३) अंतर्गत तीन जोडलेले गुन्हे सादर करण्यात आले. त्यापैकी प्रत्येकाला वाढती शिक्षा आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, एखाद्या व्यक्तीने आपल्या फोनवर 'चाईल्ड पोर्नोग्राफी' पाहिली आणि नंतर ती डिलीट केली, तरीही तो गुन्हेगारच आहे. आपण त्याला गुन्हेगार न मानल्यास कोणीही या कायद्याद्वारे फसवणूक करू शकतो. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीने आपल्या मोबाईलवर 'चाईल्ड पोर्नोग्राफी' पाहिल्यानंतर ताबडतोब डिलीट केल्यास संबंधित व्यक्ती कायद्यानुसार जबाबदार नाही, असे म्हणता येईल का? विशेषत: मुलांच्या शोषणाची तक्रार नोंदवण्यास अयशस्वी ठरणाऱ्या शाळा, शैक्षणिक संस्था, कारागृहे यांच्या विरोधात न्यायालयांनी या प्रकरणी कोणतीही हयगय होऊ देऊ नये, असा इशारा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यांनी आपली जबाबदारी पार पाडून अशा प्रकरणांची तक्रार करावी. न्यायालयाने म्हटले आहे की, 'सोशल मीडिया' प्लॅटफॉर्मवर मुलांचे शोषण आणि अत्याचाराची प्रकरणे 'पोक्सो' कायद्यांतर्गत जबाबदार असलेल्या स्थानिक अधिकाऱ्यांना कळवली जात नाहीत, अशी माहिती मिळाली आहे. न्यायालयाने ताकीद दिली आहे की, हे प्लॅटफॉर्म 'आयटी' कायद्याच्या कलम ७९ अंतर्गत त्यांच्या जबाबदाऱ्यांमधून सूट मिळण्याचा दावा करू शकत नाहीत. 'पोक्सो'नुसार एखाद्याकडे लहान मुलांचे लैंगिक शोषण करणारा व्हिडीओ असल्यास त्याचा हेतू इतरांना दाखवण्याचा किंवा पाठवण्याचा असू शकतो. त्याने तो कोणाला पाठवला नसला, तरी तो गुन्हा ठरतो. आपल्या २०० पानांच्या निकालात न्यायालयाने म्हटले आहे की, गुन्हा करण्यामागील हेतूही खूप महत्त्वाचा आहे. लहान मुलांचे अश्लील व्हिडीओ ठेवल्याने कोणाचेही नुकसान होते, असे समजू नये. आपण त्याविरुद्ध पावले न उचलल्यास मुलांच्या शोषणाला प्रोत्साहन मिळते. मुलांच्या शोषणाविरुद्ध लढण्यासाठी अनेक गोष्टी कराव्या लागतील. कठोर कायदे बनवण्यासोबतच जगातील इतर देशांसोबत मिळून लोकांना जागरूक करून काम करावे लागेल. तंत्रज्ञान झपाट्याने वाढत असून इंटरनेट सर्वत्र पसरत आहे. त्यामुळे मुलांचे शोषण करणारे व्हिडीओ पसरवणे सोपे होत आहे. सर्वोच्च न्यायालयाने कायद्यात सुधारणा करण्याची शिफारस केली आहे. 'पोक्सो' कायद्यातील चाईल्ड पोर्नोग्राफी हा शब्द बाल लैंगिक शोषण आणि शोषण सामग्री (सीएसईएएम) असा बदलला जावा, असे न्यायालयाने म्हटले आहे. या गुन्ह्यांचे गांभीर्य अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेणे, हा त्यामागील उद्देश आहे. केंद्र सरकार आदेशाद्वारे हा बदल लागू करण्याचा विचार करू शकते. कोणत्याही न्यायालयीन आदेशात किंवा निर्णयामध्ये चाईल्ड पोर्नोग्राफी हा शब्द वापरू नये, तर 'सीएसईएएम' वापरावे, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने न्यायालयांना दिले आहेत. न्यायालयाने नमूद केले की, 'सीएसईएएम' या संज्ञेमुळे हे फोटो आणि व्हिडीओ केवळ अश्लील नाहीत, तर लैंगिक शोषण झाल्याच्या नोंदी आहेत किंवा कोणत्याही प्रकारचे बाल शोषणाचे चित्रण आहे. आजकाल इंटरनेट आणि 'सोशल मीडिया'च्या माध्यमातून लहान मुलांचे अश्लील व्हिडीओ झपाट्याने पसरत आहेत. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो'च्या (एनसीआरबी) अहवालानुसार २०१८ मध्ये 'चाईल्ड पॉर्न' बनवण्याची किंवा बाळगण्याची ७८१ प्रकरणे नोंदविण्यात आली. २०१७ मध्ये ही संख्या ३३१ होती. ओडिशामध्ये २०१८ मध्ये अशा प्रकारची सर्वाधिक ३३३ प्रकरणे नोंदविली गेली तर २०१७ मध्ये फक्त आठ प्रकरणे नोंदविली गेली. 'एनसीआरबी'चे अहवाल सूचित करतात की, नोव्हेंबर २०१९ पासून 'चाईल्ड पॉर्न' पाहिल्या आणि प्रसारित केल्याबद्दल देशभरात सुमारे १०० लोकांना अटक करण्यात आली किंवा समन्स पाठवण्यात आले. याशिवाय गुजरातच्या गुन्हे अन्वेषण विभागाला याच महिन्यात ६२ बालगुन्हेगारांची नावे मिळाली आहेत. ऑक्टोबर २०१९ मध्ये 'सीबीआय'ने आंतरराष्ट्रीय बाल लैंगिक तस्करी रॅकेटमध्ये सामील असलेल्या सात भारतीयांवर गुन्हे दाखल केले. 'एनसीआरबी'च्या आकडेवारीनुसार भारतात दर १५ मिनिटांनी एका मुलाचे लैंगिक शोषण होते. यापैकी किती घटना घरांमध्ये घडतात हे कळू शकत नसले, तरी स्वतंत्र अभ्यासानुसार ७० ते ९० टक्के बालकांचे लैंगिक शोषण ओळखीच्या लोकांकडून केले जाते. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने समाजाला स्पष्ट संदेश दिला आहे की, लहान मुलांवरील लैंगिक गुन्हे खपवून घेतले जाणार नाहीत. बरे झाले, सर्वोच्च न्यायालयाने हा कठोर संदेश दिला.

## दिल्ली दिनांक

# दिल्लीच्या 'अतिथी' मुख्यमंत्री!

**रवींद्र दाणी**

दिल्लीच्या 'अतिथी' मुख्यमंत्री आतिशी सिंग यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ तर घेतली; पण त्यांचे सरकार जवळपास ठप्प स्थितीत आहे. कारण त्यांना स्वतंत्रपणे कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नाही आणि ना त्यांनाही स्वतंत्रपणे सरकार चालविण्याची इच्छा आहे.

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर आपली केजरीवालनिष्ठा दाखविण्यासाठी त्यांनी मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसण्यास नकार दिला. असाच प्रकार काही वर्षांपूर्वी तामिळनाडूत घडला होता. तत्कालीन मुख्यमंत्री जयललिता यांना राजीनामा द्यावा लागल्यानंतर त्यांनी नियुक्त केलेल्या नव्या मुख्यमंत्र्यांनी जयललितांच्या खुर्चीवर बसण्यास नकार दिला होता. तामिळनाडूतील घटना असो वा दिल्लीतील, दोन्ही ठिकाणी मुख्यमंत्र्यांनी एक चूक केली आहे. देशाचे नवे राष्ट्रपती शपथ घेतल्यानंतर ते सर्वप्रथम आपल्या खुर्च्यांची अदलाबदल करतात. कारण त्याठिकाणी प्रश्न केवळ शपथ घेण्याचा नसतो तर नवा पदभार सांभाळण्याचाही असतो. खुर्चीच्या अदलाबदलला एक सांकेतिक अर्थही असतो. नव्या राष्ट्रपतींनी कार्यभार हाती घेतला आहे, असे त्यातून सूचित होत असते. पण, निष्ठा दाखविण्याच्या प्रयत्नात आतिशी यांना ते भान राहिले नसावे. तशीही त्यांची अवस्था 'अतिथी मुख्यमंत्री' अशी झाली आहे. अशा मुख्यमंत्र्यांचे आदेश कोण ऐकणार?

**सरकार ठप्प** : आप नेते अरविंद केजरीवाल तिहार कारागृहात गेल्यापासून दिल्ली सरकार तसेही ठप्प होते. सारे निर्णय नायब राज्यपाल सक्सेना घेत होते. तीच स्थिती आजही कायम आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यास एक साधा शिपाई नियुक्त करण्याचाही अधिकार राहिलेला नाही. सरकारी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या-बदल्या या साऱ्या बाबी याआधीच नायब राज्यपालांकडे सोपविण्यात आल्या आहेत. देशातील कोणत्याही सरकारची अशी केविलवाणी स्थिती नसावी. विशेष म्हणजे हे सारे देशाच्या राजधानीत होत आहे.

**२०२५ च्या निवडणुकीपूर्वी...** : केंद्र सरकारने दिल्लीचा राज्याचा दर्जा काढून दिल्लीला पूर्ववत केंद्रशासित करण्याचा विचार केला पाहिजे. दिल्लीतील राजकीय व प्रशासनिक गतिरोध संपविण्याचा तोच एक मार्ग शिल्लक असल्याचे अनेकांना वाटते. दिल्लीला राज्याचा दर्जा मिळण्यापूर्वी जी स्थिती होती ती पुन्हा बहाल करण्यात यावी अन्यथा सारी प्रशासकीय सत्ता नायब राज्यपालांकडे आणि राजकीय सत्ता आम आदमी पक्षाकडे हे विरोधाभासी चित्र कायम राहणार आहे. २०२५ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी हा विरोधाभास संपविण्याची सुवर्णसंधी केंद्र सरकारजवळ आहे. दिल्लीचा राज्याचा दर्जा काढून घेतल्याने सर्वसामान्य जनतेला काहीही फरक पडत नाही. उलट केंद्रशासित प्रदेशाचे दिल्लीतील नागरिक स्वागतच करतील. हरयाणा व पंजाबचे राजधानी असलेले चंडीगढ शहर केंद्रशासित आहे. देशातील एक सर्वात नियोजित शहर म्हणून चंडीगढची ख्याती आहे. केंद्रशासित असल्याने या शहराला अनेक सोयी-सवलती मिळत आहेत. देशाच्या राजधानीच्या शहराची मात्र दुरवस्था व्हावी? दिल्लीला केंद्रशासित करण्याची वेळ आली आहे. एका म्यानात दोन तलवारी राहू शकत नाही, हे राजकीय वास्तव स्वीकारण्याची वेळ आली आहे.

**डोळा पंजाबवर** : दिल्लीचा मुख्यमंत्री हे आता शोभेचे पद झाले असल्याने अरविंद केजरीवालही आता फार काळ या पदावर राहू इच्छित नसल्याचे समजते. त्यांची नजर पूर्वीही पंजाबवर होती आणि आताही ती असल्याचे मानले जाते. आतिशी सिंगला दिल्लीचे मुख्यमंत्री करून केजरीवाल आपला मोर्चा पंजाबकडे वळवतील, असे आपच्या काही नेत्यांना वाटते. दिल्ली विधानसभा निवडणूक केजरीवाल स्वत:च्या नावाने लढवतील आणि ती जिंकल्यानंतर ते पुन्हा आतिशीला मुख्यमंत्री करतील आणि स्वत: पंजाबचा रस्ता धरतील, असा कयास वर्तविला जात आहे. पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांना सरकार चालविता आलेले नाही. या राज्यात आपची स्थिती झपाट्याने खालावत आहे. ती सावरण्याची ताकद मान यांच्यात नाही. चार महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला १३ पैकी फक्त ३ जागा जिंकता आल्या. विधानसभा निवडणुकीत धुळधाण झालेल्या काँग्रेसने ७ जागा जिंकून जोरदार कामगिरी बजावली. सध्याची स्थिती कायम राहिल्यास पुढील विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाचा पराभव व काँग्रेसचे सत्तेत पुनरागमन अटळ असल्याचे आपच्या नेत्यांना वाटते. यातून मार्ग काढण्यासाठी केजरीवाल राज्याची सत्ता आपल्याकडे घेऊ शकतात. केजरीवाल यांना सारी सत्ता आपल्या हाती ठेवायची आहे. पंजाबात राहून ते दिल्लीवर सहज नियंत्रण ठेवू शकतात. दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांना तसा कोणताही जनाधार नाही. त्यांना या पदावर ठेवल्याने केजरीवाल यांना कोणताही राजकीय धोका नाही. या साऱ्याचा विचार करून केजरीवाल पंजाबमध्ये जाण्याचा निर्णय करू शकतात, असे आप नेते दबल्या आवाजात बोलू लागले आहेत. शिवाय दिल्लीत काय आहे? सारे अधिकार नायब राज्यपालांच्या हाती आहेत. पंजाबमध्ये केजरीवाल यांना भरपूर पैसा मिळू शकतो. त्याहीपेक्षा केजरीवाल यांना मुख्यमंत्रिपदाची जी प्रतिष्ठा हवी आहे ती त्यांना पंजाबध्ये मिळू शकते, दिल्लीत नाही.

**न्यायालयाची अडचण** : मार्च महिन्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पक्षाला विजय मिळाला, तरी मुख्यमंत्रिपदावर केजरीवाल यांचे पुनरागमन होणे सोपे नाही, असेही मानले जाते. यात मुख्य अडसर आहे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचा. दिल्ली मद्य घोटाळ्यात केजरीवाल यांना जामीन देताना त्यांनी दिल्ली सचिवालयात जाऊ नये व कोणत्याही सरकारी फाईलीवर सही करू नये या दोन अटी टाकल्या आहेत. दिल्ली विधानसभेची निवडणूक जिंकल्याने या अटी काही संपत नाहीत. या घोटाळ्याचा न्यायालयात निकाल लागेपर्यंत त्या कायम राहणार आहेत. केजरीवाल यांच्या पायात पडलेल्या या एकप्रकारे बेड्या आहेत. त्यांनी पंजाबचा रस्ता धरल्यास या सर्व कायदेशीर जाचातून ते मुक्त होतील.

**फायदा 'आप'ला?** : सीबीआय वा अंमलबजावणी संचालनालयाने दिल्ली मद्य घोटाळ्यात केजरीवाल, सिसोदिया, संजयसिंग व औषध खरेदी घोटाळ्यात सत्येंद्र जैन यांच्याविरोधात केलेल्या कारवाईचा फायदा आम आदमी पक्षाला मिळत आहे, असे मानले जाते. सीबीआय व अंमलबजावणी संचालनालयाने अशी कारवाई केली नसती तर केजरीवाल यांचा केव्हाच सफाया झाला असता. पण, या कारवाईमुळे केजरीवाल व 'आप'ला, केंद्र सरकार आपल्याला काम करू देत नाही, हे रडगाणे गाण्याची संधी मिळाली आणि या संधीचा फायदा केजरीवाल व त्यांच्या साथीदारांनी मिळविला. अन्यथा २०२० च्या विधानसभा निवडणुकीतच या पक्षाचा सफाया झाला असता.

**१५ घटना दुरुस्त्या** : 'एक देश एक निवडणूक' लागू करण्यासाठी केंद्र सरकारला एक-दोन नव्हे, तर १५ घटना दुरुस्त्या कराव्या लागतील, असे प्रसिद्ध वकील व सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष कपिल सिब्बल यांनी म्हटले आहे. एका लेखात त्यांनी हे प्रतिपादन केले आहे. या सर्व घटना दुरुस्त्या घटनेच्या मूळ चौकटीला धक्का लावणाऱ्या असतील. त्यामुळे त्यांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाईल, असेही त्यांनी लिहिले आहे. दुसरीकडे सरकारने तीन घटना दुरुस्ती विधेयकांची तयारी चालविली आहे. या तीन दुरुस्त्या केल्यानंतर 'एक देश एक निवडणूक' ही संकल्पना राबविणे सरकारला शक्य होईल. यासोबतच महिला आरक्षण विधेयकही आहे. एक देश एक निवडणूक व महिला आरक्षण विधेयक या दोन्ही बाबी २०२९ च्या निवडणुकीत लागू करण्याचा केंद्र सरकारचा मानस आहे. २०२९ अद्याप फार दूर आहे. तोपर्यंत देशाच्या राजकारणात काय काय घडते ते पाहावयाचे...!

## वेध

# खलनायक तयार करणारे चित्रपट नकोच!

**अनिल उमाकांत फेकरीकर**

चित्रपट हा समाजाचा आरसा असतो. जे समाजात घडते, तेच दाखविण्याचा प्रयत्न चित्रपटांतून केला जातो. गेल्या १०० वर्षांचा चित्रपटांचा इतिहास पाहता, जी काही कथानके तयार केली गेली, ती सर्व समाजाला कमी लेखणारी, पोलिसांची प्रतिमा खराब करणारी, नव्हे गुन्हेगारांच्या महिमामंडनाची होती. पूर्वी चित्रपट तीन तासांचा राहायचा. त्यातील २ तास ४५ मिनिटे खलनायकाचेच वर्चस्व दाखविले जायचे. उर्वरित १५ मिनिटे नायकाला मिळायचे आणि चित्रपटाचा शेवट व्हायचा. आता ज्या गोष्टीचा मानवी मनावर अधिकाधिक भडीमार केला जातो, तीच गोष्ट समाजात लोकप्रिय होत असते. त्यातूनच देशभक्त कमी आणि गुन्हेगारच वाढत गेले. एवढेच काय तर डॉक्टरांविषयीही बहुतांश चुकीच्या गोष्टी चित्रपटांतून दाखविल्या गेल्या. अशा स्वरूपाच्या कथानकांमुळे समाजावर त्याचे प्रतिकूल परिणाम झाले. एखाद्या चौकात महिलेवर किंवा सज्जन माणसावर गुन्हेगार तुटून पडतात, तेव्हा आसपासचे शेकडो लोक उभे असतात. पण आपल्याला काय करायचे, असे म्हणत ती सर्व मंडळी समूह शक्ती अक्षरश: वाया घालविते. यातून चांगल्या माणसाचा जीव जातो आणि गुन्हेगार फार मोठे युद्ध जिंकले, अशा तोऱ्यात तेथून निघून जातात. पुढे कुठलाही साक्षीदार पुढे येत नसल्याने कोर्टातही आरोपी निर्दोष सुटतो. अशा स्वरूपातील घटना आजही घडत असून त्याचे परिणाम संपूर्ण समाजाला भोगावे लागत आहेत.

पूर्वी एखादा सज्जन चौकातून जात असल्यास त्याच्या समोर वाईट कृती करण्याची कुणाचीही हिंमत होत नव्हती. आता तर तो सज्जनच घाबरतो आणि वाईट माणसे दिसताच आपली वाटच बदलवून 'वाचलो रे बुवा' असे म्हणत देवाचे आभार मानतो. अशी दुर्दैवी वेळ सज्जनांवर यावी, याचा अर्थ काय?

प्रेम करणे वाईट नसते. मग प्रेम चांगले आणि नि:स्पृह असेल तर मग त्याचा अंत वाईट का दाखविला जातो? 'एक दुजे के लिए' या चित्रपटात दोन वेगवेगळ्या प्रांतातील युवक-युवतीचे प्रेम दाखविण्यात आले. पण शेवट वाईट केला गेला. दोघांच्याही कुटुंबीयांचा अहंकार त्यांना संपविणारा ठरला. असाच अहंकार दाखविण्याची किंवा समाजावर बिंबवण्याची गरज आहे का? आज तशा कथानकाची गरज नाही, तर चांगला संदेश देण्याची गरज आहे. पण तरीही 'सैराट' आला आणि लोकांनी त्याला डोक्यावर घेतले. पण त्यात काय झाले तर लग्न केल्यानंतरही पती-पत्नी आणि त्यांच्या चिमुकल्या मुलालाही भावाच्या रूपात आलेल्या गुन्हेगारांनी सोडले नाही. यातून नायक तयार होणार की खलनायक याचा विचार करायलाच हवा.

खोट्या कथांवर, रंगविलेल्या स्वप्नांचे, समाजाला भ्याड बनविणारे कथानक आज नको आहे. आज समूहशक्ती जागरूक करणाऱ्या कथानकांची गरज आहे.

पृथ्वीतलावर ९८ टक्के लोक सज्जन आहेत तर फक्त २ टक्के लोक दुर्जन आहेत. मात्र सज्जन विखुरलेले आहेत. त्याचवेळी जगातील दोन टक्के दुर्जन एकसंध आहेत. त्यांची एकसंध भूमिका सज्जनांवर नेहमीच भारी पडत आली आहे. एक आवाज दिला तर दुर्जनांचे मित्र मदतीला धावत येतात. सज्जन संकटात असेल तर त्यांच्या कुटुंबातील सदस्यसुद्धा दूर जातात. आपल्याला त्याचे काय, हा त्यांचा फेमस डायलॉग सर्व काही संपवून टाकतो. दरम्यान, अन्त्यसंस्काराला आल्यानंतर हेच सज्जन त्या गेलेल्या व्यक्तीच्या कर्तृत्वाचे गोडवे गातात. म्हणजेच काय जिवंतपणी मदत करायची नाही, मात्र माणूस गेल्यावर 'मला नाही सांगितले' असे म्हणत वेळ मारून न्यायची. सज्जन लोक असे स्वत:ला किती दिवस पडद्यामागे लपविणार आहेत? यातूनच गुन्हेगारी फोफावत आहे. याही वातावरणात काही वर्षांपूर्वी विधू विनोद चोपडा यांनी आयपीएस अधिकारी डॉ. मनोज शर्मा यांच्या जीवनावर आधारित '१२ वी फेल' हा चित्रपट आणला आणि त्यातून समाजाला काहीतरी चांगले देण्याचा प्रयत्न केला. पण अशा चांगल्या चित्रपटांची संख्या नगण्य आहे. सातत्याने वाईट गोष्टींचा भडीमार होणाऱ्या चित्रपटांच्या तुलनेत ती संख्या कमी असल्याने गुन्हेगारांचेच उदात्तीकरण होत आहे. आता हेच पाहा ना, निवडणुकांमध्ये सज्जन माणसाचे डिपॉझिट जप्त होते, तर हेच मतदार गुन्हेगार कारागृहात राहिला तरी त्याला निवडून देतात. तो कारागृहात गेलेला गुन्हेगार नेता काय स्वातंत्र्य लढ्यातील सैनिक आहे का? नाही; तो तर चोर, दरोडेखोर असतो. तरीही विखुरलेले सज्जन मतदार त्यालाच निवडून देतात आणि नंतर देशाचे वाटोळे केले असे म्हणत नेत्यांच्या नावाने बोटे मोडतात. मतदान करताना यांचे डोके ठिकाणावर नव्हते का? शेवटी, 'रिकाम्या भांड्यावर झाकण आणि चुकीच्या विचारांची पाठराखण' काही उपयोगाची नसते.

९८८१७१७८५९

## कानोसा

# शक्ती जागरणाचे पर्व

**अमोल पुसदकर**

'नवरात्री' हे शक्ती जागरणाचे पर्व आहे. ज्या वेळेला बलाढ्य महिषासुरासमोर पराक्रमी देवांचा निभाव लागला नाही, देवराज इंद्र पराभूत झाला, त्यावेळेला सर्व देवतांनी एकत्र येऊन स्त्री देवतेची प्रार्थना केली. त्यांच्या समोर जी मूर्ती साकार झाली त्या प्रतिमेला त्यांनी आपापल्या जवळच्या सर्वोच्च शक्ती दिल्या. भगवान शंकरांनी आपले त्रिशूल दिले. भगवान विष्णूंनी आपले सुदर्शन चक्र दिले. इंद्राने आपले वज्र दिले. वरुणाने आपली गदा दिली. अशा सर्व प्रकारांच्या आयुधांनी ती देवी सज्ज झाली. त्यानंतर महिषासुराच्या एकापेक्षा एक बलाढ्य राक्षसांचा तिने पराभव केला. महिषासुर देवीला म्हणतो, 'तुझ्यासारख्या सुंदर स्त्रीला मारणे मला शक्य होणार नाही. त्यामुळे तू माझ्याशी लग्न कर.' महिषासुरमर्दिनी त्याला म्हणाली, 'मी तुझ्यासाठी वधू म्हणून आलेली नाही. मी तुझ्यासाठी तुझा मृत्यू म्हणून आलेली आहे. त्यामुळे हुशार असशील, समज असेल तर तू आतासुद्धा युद्धातून पाय मागे घेऊ शकतो. अन्यथा तुझा मृत्यू निश्चित आहे.' महिषासुरमर्दिनी दुर्गेचे महिषासुरासोबत नऊ दिवस आणि रात्र युद्ध झाले आणि त्या युद्धामध्ये महिषासुराचे निर्दालन झाले. महिषासुराचे निर्दालन जरी दुर्गेने केले असले, तरी शक्तिस्वरूपा दुर्गेला आयुधांनी सज्ज करण्याचे काम देवांनी केलेले होते. देवांनी आपल्या जवळची सर्वोच्च शक्ती दुर्गेला दिली. 'देव जुटे यत्नो मे सब, असुर निवारण शेष है।' त्यानंतर दुर्गा महिषासुरमर्दिनी होऊ शकली.

प्राचीन काळापासून दैवी शक्ती आणि आसुरी शक्ती यांचा संघर्ष सुरू आहे. असुर मायावी आहेत. त्यांच्याजवळ शक्ती आहे. ते देवांना पराभूत करण्याचा सतत प्रयत्न करीत असतात. देव आणि दानवांचे तुंबळ युद्ध सातत्याने सुरू असते. परंतु, देवांना कठोर परिश्रम केल्याशिवाय विजय मिळत नाही, हे सत्य आहे.

आज महिषासुरमर्दिनी दुर्गेच्या रूपामध्ये आम्ही जर भारतमातेची मूर्ती आपल्यासमोर आणली तर आपल्या असे लक्षात येईल की, आजही दैवी आणि असुर शक्तींचा संग्राम सुरूच आहे. असूर शक्ती फक्त भारतालाच प्रताडित करीत आहेत, त्रास देत आहेत असे नाही तर विश्वातील मानवतेला त्यांचा त्रास आहे. भारतमातेला शक्ती संपन्न करण्यासाठी देवांनी म्हणजे समाजातील सज्जनशक्तीने आपले सर्वोच्च योगदान देणे आवश्यक आहे.



इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, काही प्रमाणात अमेरिका, ऑस्ट्रेलिया, जपानसारख्या देशांमध्ये इस्लामी दहशतवाद पसरलेला आहे. इंग्लंडमधील काही शहरांमध्ये तर मुस्लिम व्यक्ती तिथला महापौर बनू शकतो अशा पद्धतीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. अनेक शहरांत भारतामध्ये जशी परिस्थिती असते तशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. तिथल्या मुस्लिमबहुल शहरांमध्ये तिथल्या ख्रिश्चन आणि इतर धर्मीय लोकांना आपला धर्म सांभाळणे आणि आपल्या सुरक्षिततेला सांभाळणे हे एक कठीण कार्य होऊन बसलेले आहे. हमास आणि इस्रायलचे युद्ध सुरूच आहे. इराण दहशतवादाचे पोषण करीत आहे. पाकिस्तानच्या जन्मापासून पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्ध मांडले. भारताची कुठलीही चूक नसताना किंवा युद्धाची प्रवृत्ती नसताना भारतामध्ये दहशतवाद माजविला. मागच्या १० वर्षांमध्ये मोदी सरकार आल्यावर या दहशतवादावर अंकुश बसला. तरीही या वेळेला २४० जागा मिळाल्यावर काश्मीरमध्ये छोट्या-मोठ्या का होईना, परंतु दहशतवादाच्या घटना घडू लागल्या आहेत. यावरून लक्षात येईल की, देशामध्ये सरकारच्या पाठीमागे संघटित आणि बलशाली समाज नसेल तर ते सरकार दुबळे ठरते. पंतप्रधान कितीही ५६ इंची छातीचा असला, तरीही त्याच्या मागे उभा असलेला समाज जर संघटित नसेल, दहशतवादाच्या विरोधात कटिबद्ध नसेल, भारतभक्त नसेल तर तो नेतासुद्धा फार काही पराक्रम गाजवू शकणार नाही. त्यामुळे भारतातील जो समाज निवडणुकीच्या काळामध्ये जाती-पातीमध्ये योजनापूर्वक विभागला जातो, त्या समाजाने आता जागृत होण्याची आवश्यकता आहे व राष्ट्रीय दृष्टिकोन ठेवून मतदान करण्याची आवश्यकता आहे. येणाऱ्या काळामध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत. स्थिर महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र, संघटित महाराष्ट्र, जाती द्वेषविरहित महाराष्ट्र यासाठी लोकांनी विवेकबुद्धीने मतदान करणे आवश्यक आहे. भारतातील निवडणुका या केवळ भारताच्या राहत नाही तर यामध्ये विदेशी शक्तीचाही प्रभाव असतो. विदेशी शक्तींना जे सोयीचे आहेत अशा लोकांना निवडून आणण्यासाठी त्यांचं धन आणि बल कार्य करीत असतं. या त्यांच्या धन आणि बलाला केवळ जागृत, संघटित, समाजशक्तीच पराभूत करू शकते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

नवरात्रीचे हे शक्ती जागरणाचे पर्व आहे. आज घरोघरी कुमारिकांचे पूजन सुरू आहे. परंतु जो देश कुमारिकांचे पूजन करतो, जो देवतेला स्त्री स्वरूपात पूजतो; त्या समाजामध्ये कोलकात्यासारख्या घटना घडतात, याचा सुज्ञ समाजाने विचार करण्याची आवश्यकता आहे. या देशामध्ये कधीतरी श्रद्धाचे तुकडे करून ते जंगलात फेकून देण्यात येतात तर कधी महालक्ष्मीचे तुकडे करून ते फ्रीजमध्ये भरण्यात येतात. या घटना पाहिल्या की, दुर्गेची उपासना करणारा समाज हाच का? असा प्रश्न पडतो. आदर्श केवळ पुस्तकात असून चालणार नाही तर तो समाजाच्या जीवनामध्ये असला पाहिजे. 'लव्ह जिहाद'च्या नावाखाली तरुणींचे बळी पडणे थांबविले पाहिजे आणि बळी पडणाऱ्यांची जागा तुरुंगात झाली पाहिजे. उत्तरप्रदेशच्या योगी सरकारने ज्याप्रमाणे लव्ह जिहादच्या विरोधात कायदा केला आहे तसा कायदा सर्वच राज्यांमध्ये झाला पाहिजे. कुठला तरी अफजल नाव बदलून पाच पाच तरुणींशी विवाह करतो. हे थांबविले गेले पाहिजे. महिषासुराने दुर्गेला विवाहाचे निमंत्रण पाठविले होते. परंतु दुर्गेने जे उत्तर दिले, 'मी तुझी वधू नाही, तुझा मृत्यू आहे!' हेच उत्तर आजच्या तरुणींनी असा लव्ह जिहादचा खेळ करणाऱ्यांना दिले पाहिजे, असे वाटते. देवांनी जसे महिषासुराच्या संहारासाठी प्रयत्न केले तशाच पद्धतीचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. जातिभेद विद्वेषविरहित बलाढ्य समाज उभा करण्यानेच शक्ती निर्माण होणार आहे. यातूनच देवांना म्हणजे सज्जनशक्तीला विजय मिळणार आहे. याची आठवण नवरात्रीच्या शक्ती जागरण पर्वाच्या निमित्ताने ठेवणे आवश्यक आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### बाजारातील भेसळयुक्त पदार्थ

बाजारात मोठ्या प्रमाणात विविध खाद्यपदार्थांची विक्री केली जात आहे. मोठमोठी हॉटेल्स, उपाहारगृह, भोजनालयांमध्ये विविध प्रकारांचे पदार्थ बनवून विक्री केले जातात. त्या वेगवेगळ्या खाद्यपदार्थांवर विशिष्ट मसाल्यांची चव देऊन त्यात केमिकल व भेसळ वस्तूचा वापर करून आकार आणि चव दिली जात आहे. बाजारात सर्रास उघड्यावर अशा पदार्थांची विक्री केली जात असते. अशा खाद्य पदार्थांमुळे अनेकांच्या आरोग्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे ठोस कायदेशीर कार्यवाही होणे गरजेचे झाले आहे. हॉटेल, उपाहारगृह, भोजनालयांमध्ये निकृष्ट दर्जाच्या तेलाचा आणि वापरलेल्या जळक्या तेलाचासुद्धा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. विविध चविष्ट पदार्थांत भेसळीचे प्रमाण वाढत आहे. तसेच पदार्थांची उघड्यावरच सर्रास विक्री केली जाते. त्यामुळे ग्राहकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. उघड्यावरील पदार्थांची गुणवत्ता तपासली जात नसल्याने त्यांची विक्रीही जोमात आहे. विक्रीकरिता खाद्य पदार्थांविषयी शुद्ध तेच प्रमाण तपासून काढणे गरजेचे झाले आहे. बाजारातील खाद्य पदार्थांची तपासणी होण्यासाठी प्रशासनाने योग्य ती कारवाई करावी

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

●● ●●

### सांस्कृतिक शहरात महिला असुरक्षित

बोपदेव घाटात गुरुवारी मित्रासोबत फिरायला गेलेल्या तरुणीवर तिघांनी बलात्कार केल्याची धक्कादायक घटना पुण्यात घडली. ही घटना ताजी असतानाच पुण्यातच दोन शाळकरी मुलींवर स्कूल व्हॅन चालकाने अत्याचार केल्याची बातमी आली. पुण्यात सातत्याने महिला अत्याचाराच्या घटना घडत असल्याने सांस्कृतिक शहर असलेल्या पुण्याची मान शरमेने खाली झुकत आहे. या घटनांनी सांस्कृतिक, सुसंस्कृत तसेच सुरक्षित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात तरुणी, महिला आणि मुली सुरक्षित आहेत का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. पुण्यात मागील सहा महिन्यांत महिला अत्याचाराच्या ३६० घटना घडल्या आहेत, ही आकडेवारी धक्कादायक आहे. विद्येचे माहेरघर सुसंस्कृत पुण्यात पोलिसांचा गुन्हेगारांवर धाक राहिला नसल्याचेच हे निदर्शक आहे. महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना पुणे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आहेत. म्हणून पुणे पोलिसांनी पुण्यातील वाढत्या महिला अत्याचारांच्या घटनांना आवर घालायला पाहिजे. वाढत्या महिला अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी पुणे पोलिसांनी ठोस धोरण आखायला हवे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

### आदिशक्तीचा जागर!

आदिशक्तीची नऊ रूपं आहेत. त्यापैकी एक दुर्गा. जेव्हा परब्रह्माने त्रिदेवांची उत्पत्ती केली तेव्हाच त्यांच्या कार्याला शक्ती पुरविण्यासाठी आदिशक्तीची निर्मिती केली. देवीची उपासना म्हणजे या आदिशक्तीचीच उपासना करणे. शक्तीशिवाय जीवन अपूर्ण आहे. प्रकृती व पुरुष हे दोन जगाचे प्रमुख घटक आहेत. शक्तीशिवाय हे अपूर्ण राहतात. जो जो आदिशक्तीची उपासना करतो त्याला शक्ती प्राप्त होत असते. मग ते देव असो वा असुर. उदा. असुर शक्तीची उपासना करून उन्मत्त होतात व अधर्माचरण करतात तेव्हा देव अवतार धारण करतात; तो दुर्जनांचा नाश करण्यासाठी; तेव्हा त्याच्या कार्याला आदिशक्तीच शक्ती पुरवत असते. सद्यस्थितीत असुरी वृत्ती प्रबळ होत आहे. या वृत्तीला नष्ट करायचे असेल, तिचा नायनाट करायचा असेल तर शक्तीची उपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आदिशक्ती म्हणजे भगवंताची शक्ती आहे. तिच्यामुळे भगवंताने निर्माण केलेल्या या सृष्टीचे चक्र चालू राहते. जसे अग्नी आणि अग्नीची दाहकशक्ती एकच आहे; तसे भगवंत आणि त्याची शक्ती एकच आहेत. निर्गुण भगवंताचे सगुणत्व शक्तीमुळे आहे. त्रिगुणांच्या आधारे आदिशक्ती सर्व कार्य करते आणि सर्वांकडून कार्य करवून घेते. मग ते देव असो, दानव असो की मनुष्य असो. या सर्वांकडून होणारे कार्य आदिशक्तीच्या कृपेमुळेच होत असतात. काही जणांना प्रश्न पडतो, सर्व काही आदिशक्तीच्या इच्छेने होते, तर आपण का धडपडावे? आपण का कार्य करावे? पण असे नाही. मनुष्य जन्म हा भगवंत प्राप्तीसाठी अतिशय महत्त्वाचा आहे. जोपर्यंत आपण योग्य कर्म करत नाही, धर्मकार्य करत नाही तोपर्यंत आपल्याला भगवंताची प्राप्ती होत नाही म्हणून आपले जे ध्येय आहे ते गाठण्यासाठी आपल्याला या शक्ती आधारे कर्म करावे लागते, असे प्रत्यक्ष भगवद्गीतेत सांगितले आहे. स्वतः धर्माचरण करून संपूर्ण विश्वाला धर्म बंधनात बांधण्यासाठी आपण जे कार्य करतो, त्याला शक्तीची आवश्यकता आहे. त्यासाठी आपण सर्वांनी मां भगवतीला, आदिशक्ती दुर्गादेवीला प्रसन्न करण्यासाठी आपल्याला मिळालेले हे नऊ दिवस म्हणजे नवरात्री. या नऊ दिवसांत देवीच्या नऊ रूपांची पूजा करूया, प्रार्थना करूया हे... 'आदिशक्ती देवी, या जगात सुर आणि असुर ही दोन्ही तुझीच रूपे आहेत. तू देव व असुर दोघांची जननी आहेस. जेव्हा असुरांचे वर्चस्व वाढते आणि धर्माचा ऱ्हास होतो, तेव्हा तू असुरांचा नाश करतेस. आताही पृथ्वीवर वाईट प्रवृत्तींनी थैमान घातले आहे. या असुरी दुष्प्रवृत्तीच्या नाशासाठी आम्हाला शक्ती दे व भगवंताच्या धर्मस्थापनेच्या कार्यात आम्हाला सहभागी होता येऊ दे...'

**रमा देशमुख**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पिडीत चिमुकलीला न्याय देण्यासाठी माजलगावकराचा आक्रोश

## हजारो महिलासह नागरिक उत्स्फूर्तपणे रस्त्यावर;माजलगाव कडकडीत बंद





**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.७ ऑक्टोबर**

शहरातील पाच वर्षाच्या पिडीत चिमुकलीला न्याय देण्यासाठी सोमवारी हजारो शाळकरी मुला-मुली,महिलासह नागरिक रस्त्यावर उतरले. पक्ष, समाज, जात, धर्म, संघटनाचे जोडे बाजूला ठेवून केवळ चिमुकलीला न्याय देण्यासाठी शहर कडकडीत बंद ठेवुन प्रत्येकजण या मोर्चामध्ये सहभागी झाला होता.माजलगावकराचा आक्रोश केवळ चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाला फाशी द्या फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवावा अशी मागणी रस्त्यावर उतरलेल्या संतप्त माजलगावकरांनी प्रशासनाकडे केली.

शहरालगत असलेल्या एका खाजगी मराठी शाळेतील माध्यमिक विद्यालयात शिक्षक असलेल्या राहुल वायखिंडे या नराधम शिक्षकाने बालवाडी वर्गातील ५ वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार केल्याची संतापजनक घटना घडली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी आरोपीस तात्काळ अटक केली. त्यानंतर आरोपीला फाशी दया व फास्ट ट्रॅक कोर्टात प्रकरण चालवा या मागणीसाठी सोमवारी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात शाळकरी मुला-मुलींची महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. त्याचबरोबर सामाजिक कार्यकर्ते देखील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मोर्चाची सुरूवात हनुमान चौकापासुन झाली. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे तहसिलवर धडकला. यावेळी चिमुकल्यांनी तहसिलदारांना निवेदन दिले.

बदलापूरमध्ये पोलिसांच्या भूमिकेमुळे घटनेनंतर ज्याप्रमाणे कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता.माजलगाव मध्येही सदरील प्रकरण अतिशय गंम्भीर व संवेदनशील होते. मात्र सहाय्यक पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी बी धीरजकुमार व पोलिस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांनी अतिशय संयम व सावधगिरीने हे प्रकरण हाताळले. त्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

# आमदार पवार यांनी लावला गेवराई तालुक्यात विकास कामाचा धडाका

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.७ ऑक्टोबर**

आमदार लक्ष्मण पवार यांनी गेवराई तालुक्यात विकास कामाचा धडाका लावला असून अनेक ग्रामीण भागात रस्त्याचे दर्जेदार जाळे तयार करून ग्रामीण भागालाही न्याय देण्याचे काम केले त्यामुळे आमदार पवार यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली आहे.



आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या माध्यमातून गेवराई तालुक्यातील एन एच६१ मंगरूळ रस्ता, जातेगाव मुख्य रस्ता ते माळहिरवा, मादळमोही ते मानमोडी, चकलांबा ते तरटगव्हाण रस्ता, रामा- ६२ ते रसुराबाद रस्ता व चकलांबा ते बाळानाईक तांडा असे एकूण रस्ता सुधार योजना अंतर्गत १७ कोटी रुपये रस्ता कामाचा भव्य उद्घाटन समारंभ दि.७-१०-२४ रोजी गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण आण्णा पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. मागील अनेक वर्षापासून या भागातील नागरिकांची रस्त्याची मागणी होती अत्यंत खराब रस्त्याहून त्यांना गावाकडे ये जा करावे लागत होते परंतु त्यांची ही अडचण आमदार लक्ष्मण पवार यांच्या माध्यमातून आता दूर झाली असून लवकरच त्यांना दर्जेदार रस्ता तयार करण्यात येणार आहे त्यामुळे या भागातील नागरिकांतून आमदार पवार यांचे कौतुक होत असून त्यांची लोकप्रियता वाढली आहे.

## शाळा कॉलेजातील टवाळखोरांवर कारवाई

# पोलीस अधीक्षकांचा बडगा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑक्टोबर**

बीड पोलिसांना माहिती मिळाली होती की काही टवाळखोर हे कॉफी शॉप, शाळा, कॉलेज समोर, ट्युशनला जाण्याच्या रस्त्यावर उगाचच टवाळक्या करत उभे राहतात आणि त्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या महिला मुले मुली तसेच शाळा कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलींना विद्यार्थिनींना याचा त्रास होत असतो. अशा टवाळखोरांवर कारवाई करण्याच्या सूचना वरिष्ठांकडून प्राप्त झाल्या होत्या. त्यावरून बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनला पथके स्थापन करून सदर पथकांच्या मदतीने बीड शहर व जिल्ह्यात आज एकुण ६७ टवाळखोरांना बीड पोलिसांनी ताब्यात घेतले आणि त्यांच्यावर मुंबई पोलीस कायद्याप्रमाणे कारवाई केली आहे.



सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.शितलकुमार बल्लाळ, मारुती खेडकर, अशोक मुदीराज, विनोद घोळवे, सपोनि मधुसुदन घुगे, राजकुमार ससाने, सोमनाथ नरके व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

## आज बीडमध्ये खा.डॉ श्रीकांत शिंदे यांचा विधानसभा संवाद दौरा मेळावा

**शिवसैनिकांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे-जगताप, मुळूक**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑक्टोबर**



विधानसभा सभा निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या असताना आचार संहिता लागू होण्या अगोदर शिवसेना नेते संसदरत्न खासदार मा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांचा येत्या मंगळवारी दि. ८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२.०० वाजता शहरातील आशीर्वाद मंगल कार्यलय बार्शी रोड येथे बीड विधानसभा संवाद दौरा मेळावा होणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांनी दिली आहे. यासंदर्भात दोन दिवसांपूर्वीच शिवसेना उप नेते तथा मराठवाडा संपर्कनेते अर्जुनजी खोतकर साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मेळाव्याच्या पूर्व तयारी साठीची बैठक देखील पार पडली. या बैठकीमध्ये अर्जुनजी खोतकर साहेब यांनी खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब बीड मतदार संघात पहिल्यांदा येत असून त्यांच्या विधानसभा संवाद दौरा मेळाव्या बाबत महत्वपूर्ण सूचना मार्गदर्शन केले. त्यांनी केलेल्या सूचनेनुसार बीड शिवसेना महिला आघाडी, युवासेना, सर्व अंगीकृत संघटनेचे आजी- माजी पदाधिकारी-लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या उत्साहाने कामाला लागले असून डॉ श्रीकांत शिंदे यांचा विधानसभा संवाद दौरा मेळावा अत्यंत शिस्तीत आणि नियोजनबद्ध पार पडेल असे बीड शिवसेनेच्या वतीने सांगण्यात आले असून बीड जिल्ह्यातील सर्व शिवसैनिकांनी जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप आणि सचिन मुळूक यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री छत्रपती राजर्षी शाहू बँकेस शुन्य टक्के एन.पी.ए.पुरस्कार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑक्टोबर**

महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र तसेच बीड व महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील अग्रगन्य असलेली श्री छत्रपती राजर्षी शाहू अर्बन को-ऑप. बँक लि., बीड या बँकेस स्थापनेपासून आजपर्यंत विविध पुरस्कार मिळालेले आहे. श्री छत्रपती राजर्षी शाहू बँकेस सन २०२३-२०२४ या वर्षातही चांगली कामगिरी करुन बँकेचा एन.पी.ए. शुन्य टक्के (०%) ठेवण्यास यश संपादन केले त्याबद्दल शुन्य टक्के एन.पी.ए. पुरस्कार बँकेस मिळालेला आहे.



पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., पुणे यांनी आपल्या बँकेस सन २०२३- २०२४ या वर्षात चांगली कामगिरी करून बँकेचा एन.पी.ए. (NPA) शुन्य टक्के ठेवण्यात यश आणि चांगली कामगिरी केल्याबद्दल आपल्या बँकेस दिनांक २८ सप्टेंबर-२०२४ रोजी पुणे येथे मा. श्री. ना.मुरलीधर मोहोळ, सहकारी आणि नागरी विमान वाहतुक राज्यमंत्री, भारत सरकार नवी दिल्ली, मा.श्री. दिपक तावरे, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. अनिल कवडे, आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. श्री. सतिष मराठे, संचालक, रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया, मा.डॉ. हेमा यादव, निदेशक वैकुंठ मेहता राष्ट्रीय सह. प्रबंधक संस्थान, मा. श्री. बाळासाहेब अनास्कर, प्रशासक MSC बँक, मुंबई यांचे हस्ते पुरस्कार स्विकारतांना बँकेचे संचालक इंजि. अनंतराव काळकुटे, इंजि. प्रकाश भांडेकर, इंजि. अभय कदम, श्री. रामहरी गव्हाणे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. भगवान पवार, अधिकारी श्री. दिनेश घोडके, श्री. बिभीषण पवार इ.

# माजलगाव ता.माहेश्वरी महिला सभांच्या वतीने दसरा-दिवाळी निमित्ताने महिला महाएक्सपोचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.७ ऑक्टोबर**

माजलगाव तालुका माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने दसरा दिवाळी सणाचे औचित्याने यावर्षी ही खास महिलांसाठी महिला महाएक्सपोचे आयोजन दि.७ व ८ऑक्टोबर पासुन करण्यात आले आहे. आज दी ७ ऑक्टोंबर सोमवार रोजी माजलगाव गोशाळा चे अध्यक्ष जुगलकिशोर भुतडा व कल्पना भुतडा यां जोडीच्या शुभहस्ते उद्घाटन झाले.या महाएक्सपोचा महिलांनी लाभ घ्यावा.असे आवाहन माहेश्वरी महिला मंडळासह माहेश्वरी सभा,माहेश्वरी युवा संघटन व तालुका माहेश्वरी सभेच्या यांच्या वतीने करण्यात आले आहे.



या उद्घाटन कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून विक्रम चहा चे एरिया मॅनेजर सचिन डुबे साहेब लावले होते तर या कार्यक्रम प्रसंगी समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होते यात गंगाभिषण इंदाणी (काकाजी)जगदीश चांडक,राधेश्याम लोहिया पांडुरंग चांडक,गोपाल मानधने, गणेश लोहिया व सुखानंद तोष्णीवाल तर महीला मध्ये प्रमुख उपस्थितीत माजी नगरसेवक राजश्री मुंदडा,किरण मुंदडा,भाग्यश्री करवा,व निलम मालपाणी व महिला माहेश्वरी सभेच्या सर्व पदाधिकारी महिला उपस्थित होत्या.

माजलगाव तालुका माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने महिलांसाठी राजस्थानी मंगल कार्यालय येथे महाएक्सपोचे आयोजन मागील वर्षी केले होते.त्यास महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला होता.याहीवर्षी माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने दसरा दिवाळी सणाचे निमित्ताने खास महिलांसाठी महिला महाएक्सपोचे आयोजन केले आहे.हा महाएक्सपो सोमवार दि.७ऑक्टोबर रोजी राजस्थानी मंगल कार्यालय माजलगाव.येथे उद्घाटन झाले.दोन दिवशीय महाएक्सपोत महिलांना एकाच छताखाली खरेदी करता यावी यासाठी विविध प्रकारचे स्टॉल लावले आहेत. त्यामुळे महिलांना संसारोपयोगी साहित्यासह साड्या,कुर्तीज,फॅन्सी ड्रेसेस, सुंदर इमिटेशन ज्वेलरी,दिवाळी डेकोरेशन साहित्य,खास हॅन्डमेड वस्तु, स्नॅक्स, विविध प्रकारच्या बॅग ड पर्स,देवाचे पोशाख यासह इतर ही महिलांच्या संबंधित साहित्य खरेदीसाठी आपला वेळ एकाच ठिकाणी द्यावा लागेल.हा एक्सपो महिलांसाठी पर्वणीच ठरणार आहे.यासाठीचे नियोजन माहेश्वरी महिला मंडळासह माहेश्वरी सभा,माहेश्वरी युवा संघटन यांच्याकडून करण्यात आले आहे.तरी महिलांनी या खास महिलांसाठी असलेल्या महाएक्सपोचा लाभ घ्यावा.असे आवाहन ही माजलगाव तालुका माहेश्वरी महिला मंडळासह माजलगाव माहेश्वरी सभा,माहेश्वरी युवा संघटन यांच्या वतीने करण्यात आले आहे. ह्या कार्यक्रमाचे प्रायोजन विक्रम चहा चे सचिन डुबे यांनी घेतले आहे.

# भ्रष्टाचार निर्मुलन समिती बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.७ ऑक्टोबर**

जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड तथा जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-याविरुध्द प्राप्त होणा-या तक्रारींबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार समिती स्थापन करण्यात आली असून त्याअनुषंगाने प्राप्त तक्रारीची पडताळणी करुन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी संबधित तक्रारीविषयी प्राप्त तक्रारीला पत्राव्दारे उत्तरे देण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अदित्य जीवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुयवंशी, तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी तसेच संबधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून सत्ताधारी योजनांच्या प्रचारातच व्यस्त– खा. आष्टीकर

## हिंगोली जिल्हा ओला दुष्काळ जाहीर न केल्यास न्यायालयात जाणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ आक्टोबर**

हिंगोली जिल्ह्यासह नांदेड जिल्ह्यातील हदगाव, किनवट, यवतमाळ मधील महागाव, उमरखेड तालुक्यात अतिवृष्टी झाली. हिंगोली जिल्हा प्रशासनाकडून शासनाकडे अहवाल सादर करूनही जिल्हा ओला दुष्काळ जाहीर झाला नाही ही अत्यंत खेदाची बाब असून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून सत्ताधारी योजनांच्या माध्यमातून निवडणुकीच्या प्रचारात व्यस्त असल्याचा घणाघात ठाकरे गटाचे हिंगोली लोकसभेचे खा नागेश पाटील आष्टीकर यांनी पत्रकार परिषदेत केला.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात अतिवृष्टीसंदर्भात शासनाने दिलेल्या निधीचा तसेच अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचा आढावा घेण्यासाठी खा नागेश पाटील आष्टीकर यांनी बैठक घेतली. बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधतांना हिंगोली जिल्ह्यातील हिंगोलीसह वसमत, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ तालुक्यात अतिवृष्टी झाली आहे. ७० ते ७५ टक्के शेतकऱ्यांचे सोयाबीनसह कापूस, ज्वारी व इतर पिकांचे आतोनात नुकसान झाले असल्याचे सांगितले. तसेच लोकसभा मतदारसंघातील किनवट, हदगाव, उमरखेड, महागाव येथेही अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जिल्हाधिकारी यांनी अतिवृष्टी झाल्याचा अहवालही शासनाकडे सादर केला आहे परंतु शासनाने हिंगोली जिल्ह्याला अतिवृष्टीमधून कोणत्या निकषांवर वगळले हेच समजत नाहीत. शासनातील सचिव दर्जाचे अधिकारी आणि शासनकर्ते यांचे डोके ठिकाणावर नसल्याचा आरोप यावेळी त्यांनी केला. हिंगोली जिल्हा अतिवृष्टीमध्ये आचारसंहितेआधी शासनाला टाकावाच लागेल अन्यथा आम्ही न्यायालयात दाद मागणार आहोत वेळप्रसंगी रस्त्यावरही उतरून शेतकऱ्यांना न्याय देणार असल्याचा इशारा यावेळी आष्टीकर यांनी दिला आहे. राज्यात सर्वात जास्त नुकसान हिंगोली जिल्ह्याचे सर्वात जास्त नुकसान झाले आहे. हिंगोली जिल्हा ओला दुष्काळ जाहीर न झाल्यास इतर जिल्हे ओला दुष्काळ कसे जाहीर करतात.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रीम रक्कम मिळावी, पिकवीम्याचा आढावा घेत आहोत, अतिवृष्टीच्या नुकसानीचे पैसे मिळावेत यासाठी आम्ही वारंवार पाठपुरावा करीत आहोत परंतु सत्तेतील लोकप्रतिनिधी यावर चकार शब्द बोलायला तयार नाहीत. त्यांना विविध प्रकारची आमिषे दाखवली जात असल्याचा आरोपही यावेळी खा. आष्टीकर यांनी केला.

# औंढा येथील सर्व बँकेत पैसे काढण्यासाठी शेतकऱ्यांची गर्दी

## बँक व्यवस्थापनांमध्ये सुविधांचा अभाव

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, ७ आक्टोबर**



औंढा नागनाथ तालुक्यात दि ५ आक्टोबरला पी एम किसान योजना व मुख्यमंत्री योजना तसेच लाडकी बहीण योजनेचे हप्ते जमा झाल्याने औंढा नागनाथ येथील पीडीसीसी बँक १ व २ च्या शाखेत तसेच महाराष्ट्र बँक स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत महिलांसह शेतकरी वर्गाची तोबा गर्दी झाली होती. सर्वच बँकेत मात्र या ग्राहकांसाठी कुठल्याही सुविधा नसल्याचे दिसून येत आहे येथील सर्वच बँकेमध्ये अपुरी जागा असल्याचे दिसून येत आहे बँकांमध्ये एका वेळेला दहा ग्राहकही बसू शकत नाहीत अशी अवस्था आहे. जवळजवळ १०४ गावांचा व गावातील शेतकऱ्यांचा व्यवहार चालतो मात्र अद्यापपर्यंत ही कुठल्याही बँकेने ग्राहक सेवेबाबत दाखविले नाही. अनेक ठिकाणी ग्राहकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. बसण्यासाठी सावलीही नाही अनेक तासभर रांगेत उन्हामध्ये ताटकळत बसून आपला नंबर येण्याची वाट बघावी लागते शिवाय लाडकी बहीण योजनेतील अनेक महिला बँकेच्या कडेने किंवा बँकेच्या बाहेर इतरत्र बसून आपला नंबर येण्याची वाट बघत आहेत. त्यातच ५ आक्टोबर रोजी पी एम किसान सन्मानिधी व मुख्यमंत्री अनुदान योजनेचे व लाडकी बहीण योजनेचे हप्त एकत्रच पडल्याने दोन दिवसाच्या सुट्टीनंतर आज सोमवारी बँक चालू झाल्यामुळे एकंदरी त अफाट गर्दी बँकेसमोर दिसून आली. ज्येष्ठ नागरिक व महिला ह्या सर्वच बँकेसमोर उन्हातान्हात पाण्याविना ताटकळत बसल्याचे दिसून आले. शिवाय कुठल्याही बँकेला पार्किंगसाठी जागा नसल्याने सर्वच बँकेच्या समोर आणि रस्त्यावरच लोकांनी आपले वाहने उभे करून वाहतुकीला अडथळा निर्माण केला होता. बँक व्यवस्थापनाने ग्राहकांना सुविधा पुरविण्याची मागणी सर्वच बँकेच्या ग्राहकाकडून होत आहे.

# आई जगदंबा महोत्सव समितीच्यावतीने विजेत्यांना बक्षीस वितरण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ आक्टोबर**

आई जगदंबा नवरात्र उत्सव समिती एनटीसी हिंगोलीच्या वतीने गरबा-दांडिया महोत्सवातील प्रथम व द्वितीय दिवसाच्या विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. हिंगोली येथील वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञाचा सन्मान समितीच्या वतीने करण्यात आला.



आई जगदंबा नवरात्र उत्सव समिती एनटीसी हिंगोलीच्या वतीने गेल्या दोन दिवसापासुन पाच दिवशीय गरबा व दांडिया महोत्सव हॉटेल शिवलिला पॅलेस येथे सुरु आहे. रविवार दि.६ ऑक्टोबर रोजी गरबा-दांडिया महोत्सवाला उंदड असा प्रतिसाद मिळाला. हजारो दांडिया रसिक भक्ती रसात दंग होऊन रमले होते. या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रातील डॉ.मंगेश टेहरे, डॉ.दिपाली टेहरे, डॉ.अमोल देशमुख, डॉ.गजानन चव्हाण, डॉ.संदिप शिंदे, डॉ.जगन्नाथ जारे, डॉ.अयोध्या जारे, डॉ.स्वप्नील गिरी, डॉ.नितेश चौधरी यांच्यासह गायक शंतनु पोले यांचा सन्मान करण्यात आला. स्पर्धेच्या दुसर्या दिवशी प्रसिद्ध अभिनेत्री सुप्रिया सोन्नेकर यांनी गरबा-दांडियामध्ये सहभागी होऊन रसिकांना प्रोत्साहित केले. वेगवेगळया ग्रुपच्या सानिध्यात त्यांनी सहभाग घेत दांडिया रसिकांची दाद घेतली. यावेळी स्पर्धेतील विजेते बालगटामध्ये तनवी काबरा, वैष्णवी भोसले, प्रतिक्षा चोपडे, सर्वेश झाडे, रामराज नरसीकर, गुंजन बगडिया, धनवी देशमुख, जिविका वाघ, मनस्वी वडकते, नव्या शिंदे, नक्षत्र डाहाळे, युवती गटामध्ये रितु बांगर, विनया पाटील, अपेक्षा जाधव, जान्हवी डाहाळे, साक्षी भुसंडे, गौरी घुगे, पायल शर्मा,. महिला गटामध्ये सोनाली श्रीनिवास, सरिता चरण, भारती महाजन, अश्विनी बगाटे, शुभांगी चौधरी, संगिता पाठक, करुणा चौधरी. युवक गटामध्ये वैभव पारीख, विवेक आलोने, अभिजीत घोळवे, क्रिश जैस्वाल, सचिन राऊत, प्रज्वल आलोने, मुन्ना जोंधळे. तर कपल गटामध्ये प्राजक्ता गोविंद अग्रवाल, वैष्णवी कृष्णा जगताप, प्रियंका संदीप लोंढे, अनघा पेंढे, राखी शाम झंवर, दिपाली दिपक सोनटक्के या विजेत्यांना बक्षीसे देऊन गौरविण्यात आले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी आई जगदंबा उत्सव महिला समितीच्या प्रमुख शिल्पाताई नरसीकर, मनिषाताई कदम, ज्योतीताई कोथळकर, राधिकाताई देशमुख यांच्यासह मंडळाच्या सर्व महिला पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम धेतले.

# बहुजन वंचीत आघाडीच्या इच्छुकांच्या तीनही मतदारसंघासाठी आज मुलाखती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ आक्टोबर**

येथील शासकीय विश्रामगृहात दि ८ आक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता वंचीत बहुजन आघाडीच्यावतीने हिंगोली, वसमत आणि कळमनुरी या तीनही विधानसभा मतदारसंघासाठी इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात येणार असल्याची माहीती जिल्हा महासचिव ज्योतीपाल रणवीर यांनी दिली आहे.

वंचीतचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड बाळासाहेब आंबेडकर आणि प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर यांच्या आदेशान्वये जिल्ह्यातील हिंगोली, वसमत, कळमनुरी या तीनही विधानसभा मतदारसंघात वंचीतच्यावतीने इच्छुकांची चाचपणी करण्यात येणार आहेत. या मुलाखती प्रदेश उपाध्यक्षा तथा समितीच्या सदस्या दिशा पिंकी शेख यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहेत. वंचीत बहुजन आघाडीची जिल्ह्यात चांगली ताकद असून मागील काही वर्षापासून वंचीतने आंदोलनाच्या माध्यमातून लोकांचे प्रश्न सोडविले आहेत. जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदारसंघातील इच्छुकांनी कार्य अहवाल व परिचय पत्र सोबत घेऊन उपस्थित राहण्याचे आवाहन महासिचव रणवीर, जिल्हाध्यक्ष कांबळे यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### वसमत विधानसभा काँग्रेससाठी सोडा– जैस्वाल



वसमत– आगामी विधानसभा निवडणुकीत वसमत विधानसभा मतदारसंघ महाविकास आघाडीमध्ये काँग्रेसला सोडावा अशी मागणी काँग्रेस कमिटीच्या महिला आघाडीच्या सरचिटणीस प्रीती जैस्वाल यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे केली आहे. वसमत विधानसभा मतदारसंघामध्ये काँग्रेसची मोठी ताकद असून सहकार क्षेत्रावर काँग्रेसची पकड आहे. राष्ट्रवादी स्थापने आधी सातत्याने या मतदारसंघामध्ये काँग्रेसचा उमेदवार निवडून आलेला आहे. नगरपालिका, जिल्हा परिषद येथे देखील वसमत मतदार संघातून काँग्रेसची ताकद दिसून आलेली आहे. सध्या काँग्रेसला वसमतमध्ये पोषक वातावरण असल्याने हा मतदारसंघ महाविकास आघाडीतून सोडून घ्यावा अशी मागणी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या नेत्या प्रीती जयस्वाल यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुंबई येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी वसमत मतदारसंघातील काँग्रेस पक्षाच्या कार्याचा आढावा सादर केला. कशाप्रकारे काँग्रेस वसमत मधून विजयी होऊ शकते हे त्यांनी पटवून दिले. यावेळी नाना पटोले यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद देत आगामी बैठकीत वसमतचा मतदारसंघाचा विषय मांडू असे आश्वासन दिले आहे, अशी माहिती प्रिती जैस्वाल यांनी दिली.

### पिंपळखुटा येथील तरूण शेतकऱ्याची आत्महत्या

हिंगोली– तालुक्यातील पिंपळखुटा येथील तरूण शेतकरी राजू साहेबराव गताडे वय ३४ यांनी नापिकी आणि कर्जाला कंटाळून दि ७ सोमवारी रेल्वेखाली उडी मारून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. पिंपळखुटा येथील राजू गताडे यांना गावालगत दोन एकर शेत आहे. या शेतात त्यांनी सोयाबीन व इतर पिक घेतले होते. याशिवाय बँकेकडून कर्ज देखील घेतले होते. शेतीवर त्यांची आई, पत्नी, दोन मुली यांचा उदरनिर्वाह चालत होता. यावर्षी सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे त्यांच्या शेतातील पिकांचे मोठे नुकसान झाले. लागवडीचा खर्चही निघणे कठीण झाल्यामुळे उदरनिर्वाह कसा करावा, तसेच बँकेचे कर्ज कसे फेडावे यामुळे मागील काही दिवसांपासून ते अस्वस्थ होते. रविवारी दि ६ आक्टोबर रोजी ते धरातून निघून गेले. रात्री उशिरापर्यंत ते परत आले नसल्याने त्यांच्या कुटुंबियांनी त्यांचा शोध घेतला. मात्र ते सापडले नाहीत. कुटुंबियांनी ग्रामीण पोलिस ठाण्यात माहीती दिली. याचवेळी पोलिसांना हिंगोली ते कनेरगाव रेल्वेमार्गावर सावा शिवारात एका तरूणाचा रेल्वे रूळावर मृतदेह असल्याची माहीती मिळाली. पोनि विजय रामोड यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली. सदर मृतदेह राजु गताडे यांचा होता.

# दराडे विद्यालयाच्या चेतन शेळकेची विभागीय स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ आक्टोबर**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई दराडे माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी चेतन शेळके यांने नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय धावणे क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकाविला. या विद्यार्थ्यांची निवड छत्रपती संभाजीनगर विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी झाली आहे. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत चेतन ने १४ वर्ष वयोगटात १०० मीटर व ४०० मीटर अशा दोन्ही गटात धावण्याच्या स्पर्धेत हिंगोली जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. अशा प्रकारे दुहेरी यश संपादन करून शाळेच्या नावलौकिक भर घातली आहे. स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय हिंगोली यांचे मार्फत केले होते. स्पर्धा संत नामदेव पोलीस कवायत मैदान, हिंगोली येथे संपन्न झाल्या. क्रीडा अध्यापक अनिल लोळेवार यांनी चेतनला विशेष मार्गदर्शन केले. याबद्दल शाळेत मुख्याध्यापक डॉ. प्रकाश स. अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट व पर्यवेक्षक तुलसी चीलमुल यांनी चेतन शेळके व क्रीडा अध्यापक अनिल लोळेवार यांचा सत्कार केला. भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेच्या सर्व सदस्यांनी चेतन शेळके या विद्यार्थ्याचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# सपक टकरा स्पर्धेत सांदीपनी पब्लीक स्कूलला कास्य पदक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ आक्टोबर**



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,नांदेड,व नांदेड शहर महानगर पालिका,नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय सपक टकरा क्रीडास्पर्धा –श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम मनपा बॅडमिंटन हॉल,नांदेड येथे दि. ३० सप्टेंबर २४ रोजी नांदेड जिल्हा सेपक टकरा असोसिएशन नांदेड यांच्या तांत्रिक सहकार्याने क्रीडा स्पर्धा पार पडल्या.या स्पर्धेमध्ये स्थानिक सांदिपानी पब्लिक स्कूल,सुनील नगर,तरोडा बु.नांदेड येथील १४ वर्षखालील (मुली)च्या संघाला कास्य पदक मिळवले आहे. या संघामध्ये कर्णधार कु. रक्षिता रविकुमार बकवाड, कु.आरोही संदीप मानसपुरे, कु. कीर्ती रामा किरवले कु.आर्या विनोद गजभारे कु.सृष्टी सोपान राठोड या सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ खेळून जिल्हा स्तरीय शालेय सपक टकरा क्रीडा स्पर्धा मध्ये संदिपनी पब्लिक स्कूल ला रौप्य पदकाचे मानकरी ठरलेआहे. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेबरे, प्रवीण कुमार कुपटीकर, रविकुमार बकवाड, संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ.माहेश्वरी मुकुल राठोड, सौ.रेश्मा विपुल राठोड, प्राचार्या क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेकाले, क्रीडाशिक्षक व मार्गदर्शक भाऊराव राठोड, शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# राज्य अधिवेशनात प्राथमिक शिक्षक संघाच्या राज्यस्तरीय कार्यकारणीची निवड, राज्याध्यक्षपदी बसवदे, सरचिटणीस लवांडे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ सप्टेंबर**



येथील महावीर भवनमध्ये अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे राज्यस्तरीय त्रैवार्षिक अधिवेशन संपन्न झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष, संघटनेचे राज्याध्यक्ष देविदास बसवदे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून राज्य सल्लागार सुरेश भावसार प्रकाश दळवी तर व्ही एस सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

या अधिवेशनात संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्ह्यामधून शंभर सभासदांना मागे एक असे प्रतिनिधी उपस्थित होते. या अधिवेशनात संपूर्ण राज्य कार्यकारिणीची निवड करण्यात आली. राज्याध्यक्ष देविदास बसवदे, सरचिटणीस कल्याण लवांडे, कार्याध्यक्ष श्रीमती विनयश्री पेडणेकर, सल्लागार सुरेश भावसार, प्रकाश दळवी, व्ही एस सूर्यवंशी, राज्य उपाध्यक्ष व्ही. डी. देशमुख, म.ल. देसाई, अनिल महाजन, हरिदास घोगरे, विजय मनवर, लालासाहेब मगर, संयुक्त सरचिटणीस महेश देशमुख, परमेश्वर बालकुंदे, श्रीमती संध्या ठाकरे, संयुक्त चिटणीस रवींद्र काकडे, कृष्णा चिकणे, विलास आडे, मायाताई चापले, राजेंद्र निमसे, संगीता पागृत, डी.एस. कोल्हे, शुभांगी कचरे, तर विभाग प्रमुख कोकण प्रमोद पाटील पुणे, दीपक भुजबळ नाशिक, भगवान पाटील अमरावती, दिगंबर जगताप, सुनील हाके नागपूर, केशव बुरडे, संघटक राजा कावीटकर, श्रीमती पद्मशाली, शांताराम पाटील, बाळासाहेब कदम, श्रीमती कांचन कडू, श्रीमती सविता विखे, गुरुदास कुबल,जयवंत काळे, ज्योती कुडणकर, विजय पंडित ,किशोर चौधरी, श्रीमती आशाबाई झिलके, हिशोब तपासणी लोकेश गायकवाड, फारूक बेग राज्य कार्यकारणी सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी संपूर्ण राज्य कार्यकारिणीचा हिंगोली जिल्ह्याच्या वतीने संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सत्कार केला. या अधिवेशनासाठी जिल्ह्यातील शिक्षक बंधू-भगिनींनीची फार मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष व्ही.डी. देशमुख यांनी केले. सूत्रसंचालन सरचिटणीस हरिभाऊ मुटकुळे यांनी केले. आभार कार्याध्यक्ष जी.एस.खिल्लारी यांनी मानले. रमेश सूर्यवंशी, पदवीधर विभाग प्रमुख गजानन बोरकर, सल्लागार प्रकाश निळकंठे, उपाध्यक्ष जगन्नाथ खराटे एम.डी.जाधव, पद्मसिंह जाधव, शाम माने, राज्य संघटक डी.एस.कोल्हे,बाळापुर पतसंस्थेचे चेअरमन भगवानराव माखणे, सचिव सुरेश पांचाळ, संघटनेचे तालुकाध्यक्ष मधुकर गडदे, अशोकराव भिसे, मनोहर पोले, भगवानराव बेद्रे, सूर्यकांत देशमुख, भीमराव शिंदे, रमेश पानपट्टे, विलास शिंदे, साहेबराव नरवाडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.


सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हक्काचे पाणी उजनीतून थेट पाइपद्वारे सिना नदीत

## २७६ कोटी रुपयांच्या कामाचा कार्यारंभ आदेश...यशस्वी आखणी : कमी वेळेत कृष्णेचे पाणी रामदऱ्यात.... आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑक्टोबर -**

पश्चिम महाराष्ट्रातील मराठवाड्याच्या हक्काचे पाणी उजनी धरणातून १४६ कीलोमीटर पाइपलाईनद्वारे थेट सीना नदीपात्रात सोडले जाणार आहे. तुळजाभवानीच्या चरणी रामदरा तलावात कमी वेळेत अधिकाधिक पाणी पोहचावे यासाठी करण्यात आलेली आखणी यशस्वी झाली आहे. सोमवार ७ ऑक्टोबर रोजी या कामासाठी राज्य सरकारने २७६ कोटी रुपयांचा कार्यारंभ आदेश दिला आहे. दीर्घकालीन बाबींचा विचार करून घेतलेल्या या धोरणात्मक निर्णयामुळे तुळजापूरसह लोहारा



आणि उमरगा तालुक्यातील १०,८६२ हेक्टर क्षेत्राला मोठा लाभ होणार आहे. मोठ्या कौशल्याने आखलेल्या या योजनेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे यश मिळाले असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

मराठवाड्याच्या हक्काचे कृष्णा खोऱ्यातील २३.६६ टीएमसी पाणी देण्यास राज्य सरकारची मंजुरी आहे. त्यादृष्टीने सर्व निर्णयही सकारात्मक झाले आहेत. त्यातील टप्पा क्र. १, २ आणि ३ अंतर्गत ७ टीएमसी पाण्याची कामे सध्या सुरू आहेत.त्यातील तुळजापूरला येणाऱ्या टप्पा क्र. २ ची कामे सध्या अंतिम टप्प्यात आहेत. उजनी धरणातील पाणी मिरगव्हाण येथील पंप हाऊसमधून थेट सिना कोळेगाव धरणाच्या खाली सिना नदीच्या पात्रात १४६ किलोमीटर च्या पाइपलाइनद्वारे सोडले जाणार आहे.

नदीपत्रातून पाण्याला लागणारा वेळ, बाष्पीभवन त्याचबरोबर वेगवेगळ्या मार्गाने होणारा अपव्यय दूर व्हावा, यासाठी हे पाणी मिरगव्हाण पंपगृहातून थेट पाइपलाइनद्वारे सिना नदीपात्रात सोडण्याचा अत्यंत महत्वपूर्ण निर्णय मंजूर झाला असल्याचेही आमदार पाटील यांनी सांगितले. घाटणे बॅरेजपासून एकूण सहा टप्प्यात ११६ किलोमीटरचे अंतर पार करून आलेले पश्चिम महाराष्ट्रातील २.२४ टीएमसी पाणी डिसेंबरअखेरपर्यंत तुळजाभवानी देवीच्या चरणी असलेल्या रामदरा प्रकल्पात पोहोचेल, असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

अपुऱ्या माहितीच्या आधारे अर्धवट ज्ञान असलेले विरोधक केवळ दिशाभूल करण्यात माहीर आहेत.

झपाटयाने होत असलेली विकास कामे व यासाठी उपलब्ध होत असलेला निधी यावरून लक्ष विचलित करण्यासाठी जाणीवपूर्वक वायफळ बडबड केली जात आहे. आपल्या माणसांसाठी काहीतरी ठोस रचनात्मक काम करण्यापेक्षा सुरू असलेल्या कामात अडथळा आणणे ही यांची प्रवृत्ती आहे.

अश्या प्रवृत्तीवर बोलून वेळ खर्ची करण्यापेक्षा आपल्या भागासाठी आणखी दोन सकारात्मक कामे करण्याला आपण पूर्वीपासूनच प्राधान्य देत आलो असल्याचेही आ. पाटील म्हणाले.

# धाराशिव शहरात तृतीय पंथीयांसाठी स्मशानभूमी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑक्टोबर -**

धाराशिव शहरातील कपिलधारा येथील शासकीय जमिनीवर तृतीय पंथीयांसाठी स्मशानभूमी देण्यात आली.या स्मशानभूमीचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांच्या हस्ते आज ७ ऑक्टोबर रोजी करण्यात आले. अशा प्रकारचा तृतीय पंथीयांसाठी राज्यातील हा पहिला उपक्रम असून तो प्रथमच धाराशिव येथे राबविण्यात आला.

शहराजवळ असलेल्या कपिलधारा स्मशान भूमी लगत समाज कल्याण विभागाची गट नंबर १७ मधील १० आर जागा तृतीय पंथीयांच्या स्मशानभूमिसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.महाराष्ट्र सुवर्ण जयंती योजनेंतर्गत या स्मशानभूमीच्या सुशोभीकरणासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून २० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहे. यामधून स्मशानभूमीची संरक्षण भिंत, बोअर, पाण्याची टाकी, प्रवेशद्वार व इतर अनुषंगिक कामे करण्यात येणार आहे. यावेळी समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत, नगर पालिकेचे सहउपायुक्त अजित डोके, उपमुख्य अधिकारी पृथ्वीराज पवार, नगर अभियंता वैजिनाथ दुरुगकर, कार्यालयीन अधीक्षक संजय कुलकर्णी, स्थापत्य अभियंता संदीप दुबे, मनोज कलोरे, कौस्तुभकुमार घडे, श्रावण वैरागे, शबू शेख, नंदनी बनसोडे, मोगरा सय्यद, दीक्षा भगत, रागिनी नलावडे, पूजा कांबळे, रुपा कुऱ्हाडे, प्रीती भगत, साक्षी खोत, देवकी कांबळे, धनश्री सर्वगोड, निशा वाघ, माही सौदागर, कोमल पात्रे, कांची गायकवाड, आरोही गायकवाड, प्रिया चव्हाण या तृतीयपंथीयांसह अन्य तृतीयपंथी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# माजी आ. सुजितसिंह ठाकूर यांचा परंडा तालुका वारकरी संप्रदायच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.७ ऑक्टोबर -**

भारतीय जनता पार्टीचे विधानपरिषदेचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांना महाराष्ट्र विधानपरिषद शतक महोत्सवी कार्यक्रमात भारताच्या राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते विधान परिषदेतील उत्कृष्ट भाषण पुरस्कार देण्यात आला.त्याबद्दल परंडा तालुका वारकरी संप्रदायच्या वतीने सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी वेदांताचार्य ह.भ.प. दत्तात्रय महाराज हुके, शिवव्याख्याते ह.भ.प. बालाजी महाराज बोराडे (झी टॉकीज फेम), किर्तनकेशरी ह.भ.प. सतीश महाराज कदम, उद्धव सस्ते, तात्यासाहेब आष्टेकर, राजकुमार घरत इ. उपस्थित होते.

# इनोव्हीटीव जागरी मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑक्टोबर -**

मराठवाडा विभागामधील सर्व गुळ पावडर उत्पादक कारखानदारांची बैठक धाराशिव येथे संपन्न झाली. या बैठकीस बीड, छत्रपती संभाजी नगर, धाराशिव, लातूर व मराठवाड्यातील सर्व (जागरी) गुळ उत्पादक उपस्थित होते. यावेळी भाजपा सहकार विभागाचे मराठवाडा प्रमुख दत्ता कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

चालू ऊस गाळप हंगाम सन २०२४-२५ मध्ये सुरु होणाऱ्या हंगामाबाबत या बैठकीत चर्चा करण्यात आली असून उद्योगा समोरील अडचणी, आव्हाने या विषयी चर्चा करण्यात आली.

गुळ पावडरचा मागील सहा/आठ महिन्यापासून सातत्याने कमी होत असल्याने यावर उपाय योजना करणे,



यावर चर्चा देखील करण्यात आली.

चालू हंगाम २०२४-२५ या हंगामामध्ये मराठवाड्यातील सर्वच गुळ पावडर उत्पादक कारखान्यांनी गाळपास आलेल्या ऊसास प्रती टन २ हजार ५०० रुपये ऊस दर देण्याचे सर्वानुमते ठरले.

सदरील २ हजार ५०० रुपये रुपये कारखाना आपल्या क्षमतेनुसार एक रकमी किंवा दोन हप्त्यामध्ये हा ऊस दर देऊ शकतील.

तसेच चालू हंगाम ०५ नोहेंबर ते १० नोहेंबरच्या दरम्यान सुरु करावा असे सर्वानुमते ठरले.

ऊस दराबाबत कोणत्याही कारखान्याने स्वतंत्र परिपत्रक काढून दर जाहीर करू नये तसेच या दरात बदल करू नये असे सर्वानुमते ठरले.

या बैठकीस अध्यक्षस्थानी व्यंकटराव गुंड, श्सुरेश पाटील, रवींद्र काळे, विजय नाडे, दत्ता कुलकर्णी, अनिल काळे,

ओंकर खुर्पे, अगरवाल, सुदाम वाभळे, दगडे, नानासाहेब पाटील, सतीश दंडनाईक, संजय खरात, अभिराम पाटील, आकाश तावडे, चाळक, गोविंद थोरबोले, कुणाल राठी, औदुंबर डिसले, व मराठवाडा विभागातील गुळ पावडर उत्पान संचालक उपस्थिती होते.

## बावची विद्यालय येथे कुष्ठरोग तपासणी व आरोग्य शिक्षण शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.७ ऑक्टोबर -**

सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठरोग) धाराशिव व उपजिल्हा रुग्णालय परंडा यांच्या मार्फत विद्यालयात इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांची कुष्ठरोग तपासणी करण्यात आली व आरोग्य शिक्षण देण्यात आले.

यावेळी शेळके ए.व्ही. (औद्योगिक परिवेक्षक), पाटील पी.डी. (अवैद्यकीय सहाय्यक) साळुंखे एस.बी. (अवैद्यकीय सहाय्यक) पडवळ एन.डी. (PMW-SDH परंडा) तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक नारायण खैरे उपस्थित होते. याप्रसंगी सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींची कुष्ठरोग तपासणी करण्यात आली व त्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी विद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# एकलव्य विद्या संकुलात दोन दिवसिय तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.७ ऑक्टोबर -**

एकलव्य आश्रम शाळा मंगरूळ-यमगरवाडी येथे दि. ५ व ६ ऑक्टोंबर रोजी तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. मुला मुलींच्या स्वतंत्र स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल म्हेत्रे व अण्णासाहेब कोल्हटकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी



तालुका क्रीडा संयोजक राजेश बिलकुले किडा मार्गदर्शक इसाक पटेल बालाजी शिरसागर, माऊली भुतेकर, गीते, महादेव माळी, घोडके, राऊत गोळ, दत्तात्रय घेवारे, ढुरे, राठोड, गोविंद सोमाणी, रामचंद्र खडके, आधटराव, राहुल जाधव, यशवंत निंबाळकर, खंडू काळे, साखरे तसेच तालुक्यातील सर्व क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

त्यावेळी मान्यवरांच्या हस्ते जिल्हा युवा मिळाल्यामुळे ज्ञानेश्वर भुतेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.दोन दिवस संपन्न झालेल्या या स्पर्धेत सहाशे पन्नास विद्यार्थी सहभागी झाले होते.

## घाटशिळ परिसर : सुविधांचा अभाव, पालिकेचे दुर्लक्ष

**तुळजापूर, दि.७ ऑक्टोबर -**

शहरातील घाटशिळ रोड येथील स्मशानभूमीत संध्याकाळच्या वेळी लाईटची सुविधा नसल्याने अंतिम संस्कार करणारे नागरिकांना अडचण निर्माण होत आहे. त्याचबरोबर स्मशानभूमीत मूलभूत सुविधा नसल्याने अंतिम संस्कार करण्यासाठी आलेल्या नागरिकांना गैरसोय होत आहे.

# अंत:करणातून भक्ती केली तरच परमेश्वराची प्राप्ती : हभप अशोक जाधव गुरुजी

## इटकळ येथील नवरात्र महोत्सवासमोर कीर्तन मोठ्या उत्साहात संपन्न


**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.७ ऑक्टोबर -**

इटकळ येथील जय माता दि मंडळाच्या वतीने नवरात्र महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असून नवरात्र महोत्सवाच्या तिसऱ्या माळेचे औचित्य साधुन बाभळगाव येथील कीर्तनकार हभप अशोक जाधव गुरुजी यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. हभप अशोक जाधव गुरुजी हे गेल्या तीस वर्षांपासून निरपेक्ष अशा सेवेतून प्रवचनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करतात. यावर्षी प्रथमच त्यांनी कीर्तन सेवेस सुरुवात केली आणि मौजे इटकळ येथे जय माता दी मंडळासमोर त्यांच्या कीर्तन सेवेचा कार्यक्रम शनिवार दि.५ ऑक्टोंबर रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. हभप अशोक जाधव गुरुजी यांनी कीर्तन सेवेच्या माध्यमातून भक्तीचे महत्त्व विषध करीत तरुणांनी



व्यसनापासून दुर राहावे असा संदेश ही कीर्तन सेवेतून दिला. यावेळी बाभळगाव, केरुर, इटकळ येथील भजनी मंडळ उपस्थित होते. हभप. अशोक जाधव गुरुजी यांच्या पहिल्याच कीर्तनाचे श्रोते मंत्रमुग्ध झाले. जय माता दि मंडळांनी याही वर्षी विविध धार्मिक कार्यक्रम राबवत असल्याने ग्रामस्थांतून कौतुक केले जात आहे.

# श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे यश



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.७ ऑक्टोबर -**

श्री माधवराव पाटील महाविद्यालय, मुरुम येथे नुकत्याच पार पडलेल्या शिक्षणमहर्षी कै.माधवराव पाटील राज्यस्तरीय वाद-विवाद स्पर्धेमध्ये उमरगा येथील श्री.छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या संघाने घवघवीत यश संपादन करीत दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० : तारक की मारक या विषयावर ही स्पर्धा पार पडली. एकूण ७ हजार रुपये रोख, स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र असे या पारितोषिकांचे स्वरूप होते. यशस्वी विद्यार्थ्यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.

यशस्वी विद्यार्थ्यांना प्रा.डॉ.पी.डी. पाटील, प्रा.डॉ.व्ही.एस.सुर्यवंशी, प्रा.डॉ. व्ही.एम.गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे, उपाध्यक्ष अश्लेश मोरे सर्व संचालक, प्राचार्य डॉ. संजय अस्वले, उपप्राचार्य डॉ.विलास इंगळे, उपप्राचार्य डॉ.पद्माकर पिटले, प्रबंधक राजकुमार सोनवणे, अधिक्षक नितीन कोराळे, सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

**जाहिर प्रगटन**
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार परंडा यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/ जन्म-मृत्यू/क्रमांक**

ज्याअर्थी अर्जदर गौसिया बेगम महेबुबअली काजी रा.परंडा ता.परंडा जि. धाराशिव यांचा जन्म दिनांक.०५/०१/१९८१ रोजी मी परंडा तालुका. परंडा जि.धाराशिव येथे झालेला असून, त्याबाबतची नोंद नगरपरिषद कार्यालय परंडा ता.परंडा जि.धाराशिव येथे नसल्याने अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज करून स्वतः च्या जन्माची नोंद अभिलेखामध्ये घेणे करीत आदेशीत करण्याबाबत विनती अर्ज केलेला आहे.

सररहू अर्जदार गौसिया बेगम महेबुबअली काजी रा.परंडा ता.परंडा जि.धाराशिव यांच्या जन्मनोदी बाबत/जन्मस्थळाच्या नोंदीबाबत कोणाचा आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत लेखी स्वरूपात कळविण्यात यावी असे या जाहीरनाम्याद्वारे कळवीण्यात येते, विहित मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदाराचे अर्जात मागणी केलेनुसार विनंती प्रमाणे पुरावा घेऊन आदेश पारित करण्यात येईल.

दिनांक ०२/०८/२०२४ रोजी सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी दिले.

**स्वाक्षरित /-**
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार, परंडा**

# पंढरपूरच्या धरतीवर गोरोबा काकांच्या मंदिरात सागवानी सभामंडप

## चार कोटींचा निधी प्राप्त; हभप प्रकाश बोधले महाराज यांच्यासह संप्रदायातील मान्यवरांच्या हस्ते कामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.७ ऑक्टोबर -**

संतश्रेष्ठ गोरोबा काका यांच्या समाधी मंदिरासमोरील मुख्य सभामंडप पंढरपूर येथील विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील सागवानी सभामंडपाच्या धर्तीवर अधिक आकर्षक करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. पर्यटन विभागाचा ४ कोटी रूपयांचा निधी त्यासाठी आपण मंजूर करवून घेतला आहे. पुढील काळात गोरोबा काकांच्या मुख्य मंदिराच्या गाभाऱ्याचे कामही सामूदायिक जबाबदारीतून आपण सर्वजण मिळून नक्की यशस्वी करू, अशी ग्वाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

रविवारी धाराशिव तालुक्यातील तेर येथे संत गोरोबा काका यांच्या समाधी मंदिरासमोरील सभा मंडपाच्या कामाचा शुभारंभ प्रकाश बोधले महाराज



यांच्यासह संप्रदायातील मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. संतांच्या मांदियाळीत गोरोबा काकांचे स्थान मोठे आहे. मोठ्या आदराने त्यांचा उल्लेख संतश्रेष्ठ म्हणून केला जातो.

काकांच्या मंदिराचा विकास करण्यासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून विविध विभागाचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. उपलब्ध झालेल्या या निधीमधून प्रस्तावित असलेली सर्व प्रकारची विकासकामे करण्यासाठी आपण कटीबध्द असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

यापुढील काळातही संतश्रेष्ठ गोरोबा काका यांच्या समाधी मंदिराप्रमाणेच पुरातन वारसा लाभलेल्या प्राचीन तेर नगरीतील ऐतिहासिक वारसा जतन आणि त्याचे संवर्धन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात येईल. सध्या राज्यातील सर्वात जुने मंदिर, अशी ख्याती असलेल्या त्रिविक्रम मंदिराच्या जीर्णोध्दाराचे काम प्रगतीपथावर आहे.

त्यानिमित्ताने तेर येथील समृध्द प्राचीन इतिहास पुन्हा एकदा जागतिक पातळीवर नोंदविण्याची संधी आपल्याला उपलब्ध झाली आहे.

गोरोबा काकांचे मंदिर आणि परिसरातील कामे करण्यासाठी अपेक्षित असलेला निधी उपलब्ध करवून घेण्यात आपल्याला यश आले आहे. विविध विकासकामांच्या माध्यमातून मंदिर आणि परिसराचा कायापालट करण्याचे उद्दिष्ट आपण डोळ्यासमोर ठेवले आहे. आपल्या सर्वांचा मानबिंदू असलेल्या या तीर्थक्षेत्राला अ-दर्जा मिळावा, यासाठी आपले प्रयत्न सुरू आहेत. हा दर्जा प्राप्त करवून घेण्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या निकषांची पूर्तता करण्याचे काम सध्या सुरू आहे. लवकरच संतश्रेष्ठ गोरोबा काकांच्या तीर्थक्षेत्राला अ दर्जा बहाल केला जाईल, असा विश्वासही आमदार पाटील यांनी व्यक्त केला.

यावेळी हभप प्रकाश महाराज बोधले, महादेव महाराज बोराडे, महादेव महाराज तांबे, योगेश महाराज इंगळे, दिपक महाराज खरात, परमेश्वर महाराज बोधले, सरपंच दिदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, पद्माकर फंड, विश्वजीत पाटील आदीची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी अजीत कदम नवनाथ पसारे, प्रविण साळुंखे, किशोर काळे, राम कोळी, संजय लोमटे, सुधाकर बुकन, विष्णू एडके, मंगेश फंड, तानाजी बंडे,दत्ता मगर, आदींनी परिश्रम घेतले यावेळी मोठ्या प्रमाणावर वारकरी संप्रदायातील भक्त मंडळी उपस्थित होते.

### सामूदायिक जबाबदारीतून दगडी गाभाऱ्याचे काम

कार्यक्रमात उपस्थित असलेल्या वारकरी सांप्रदायातील ज्येष्ठ मान्यवरांनी यावेळी संत गोरोबा काका मंदिराचा मुख्य गाभारा दगडी असावा, अशी इच्छा व्यक्त केली. सध्या हा गाभारा विटांच्या बांधकामात आहे. मुख्य गाभारा दगडी बांधकामात करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून सामुदायिक जबाबदारीतून हे काम हाती घेवूया, त्यासाठी आपण स्वतः एक कोटी रूपयांची जबाबदारी घेत असल्याचे आमदार पाटील यांनी यावेळी जाहीर केले. आपल्या सर्वांच्या सहकार्यातून लवकरच मुख्य गाभारा अधिक आकर्षक आणि लक्षवेधी करण्यासाठी आपण सर्वजण मिळून आराखडा निश्चित करू, आणि त्यानुसार पुढील काम पूर्णत्वाकडे नेऊ, असेही आमदार पाटील यांनी यावेळी सांगितले.

# नांदेडात गुरुवारी महिला सशक्तिकरण अभियान मेळावा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. ०७ ऑक्टोबर**

महिला सक्षमीकरणाचा नांदेड जिल्हयाचा महिला आनंद मेळावा आता १० ऑक्टोबरला होणार आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनी आज कृषी उत्पन्न बाजार समिती मैदान नवा मोंढा मैदानावर भेट देऊन त्याच ठिकाणी बैठक घेतली.

मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये जिल्ह्यातील हजारो महिला सहभागी होणार असून प्रशासन या दृष्टीने तयारीला लागले आहे.






राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाचे हे आयोजन आहे. मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान सुरू केले असून या संकल्पनेतून सर्व जिल्ह्यांमध्ये राज्य शासनाच्या पथदर्शी योजनांमधील लाभार्थ्यांची संवाद साधने व त्यांना प्रत्यक्ष या योजनाचा कार्यक्रमांमध्ये लाभ देणे सुरू आहे. ७ ऑक्टोबरला हा मेळावा होणार होता. मात्र तो पुढे गेला असून १० ऑक्टोंबरला होत आहे. आज या संदर्भातील महत्त्वपूर्ण बैठक जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, नांदेड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, महिला व बालकल्याण अधिकारी रूपाली रंगारी कदम यांच्यासह जिल्हा जिल्हा परिषद व महानगरपालिकेतील सर्व विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. यामध्ये विविध विभाग प्रमुखांना जबाबदारी सोपविण्यात आली आहे. आज नवा मोंढा मैदानावर आमदार कल्याणकर यांनीही भेट दिली. सर्व समिती प्रमुखांना त्यांच्या कामाची जबाबदारी सोपवण्यात आली. पुढील आढावा बैठक ९ ऑक्टोंबरला होणार आहे. नवा मोंढा येथील मैदानावर होणाऱ्या या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन ,महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहे.

जिल्ह्यातील मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना या कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले आहे त्यामुळे हजारोच्या संख्येने महिला या ठिकाणी उपस्थित राहणार आहे. याशिवाय मुख्यमंत्री युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थित राहणार आहे जिल्हा प्रशासन या मोठ्या कार्यक्रमाच्या तयारीला लागले आहे.

# माजी नगरसेवकाच्या मास्टरमाईंडने इंडिया स्क्रॅपने केला 'डबल गेम'

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ०७ ऑक्टोबर**



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील भंगार घोटाळ्यात आता नव नवीन माहीती उघड होत असून विश्वसनीय सुत्रांनी दिलेलया माहितीनुसार ज्या कंपनीने भंगार खरेदीचे कंत्राट घेतले होते त्याच कंपनीने अधिकाऱ्यांना हाताशी धरून लिलाव नसलेल्या मालाची आर्थिक तडजोड करून विल्हेवाट लावली आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यलय व रूग्णालय प्रशासनाने दि. २७ जून रोजी स्थानिक वर्तमानपत्रात निविदा प्रसिध्द केली होती. यात रूग्णालयातील लोखंडी साहीत्य, प्लास्टीक साहीत्य, स्टील साहीत्य, लाकडी साहीत्य, रद्दी खरेदीसाठी आवाहन केले होते. या निविदेप्रमाणे इंडिया स्क्रॅप मर्चंन्ट या कंत्राटदाराला खरेदी करण्याची परवानगी देण्यात आली. यानुसार जवळपास ५ लाख रूपये भरून भंगार साहीत्य इंडिया स्क्रॅप मर्चंन्टने हे साहीत्य दि.१२ ते २९ जुलैच्या दरम्यान नेले. त्यानंतर दुसऱ्या एका कंत्राटदाराशी करारपत्र करून इंडिया मर्चंन्टने हा माल विक्री केला. ही प्रकीया संपली असतानाच काँग्रेसच्या एका माजी नगरसेवकाच्या मास्टरमाईंडने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांशी आर्थिक तडजोड करून इंडिया स्क्रॅप मर्चंन्टने लिलाव न झालेल्या साहीत्याची विल्हेवाट लावली. तर हे साहीत्य धनेगाव येथे असल्याची विश्वसनीय माहीती आहे. कंत्राट विक्री करून लिलाव न झालेले साहीत्य पुन्हा नेत माजी नगरसेवकाच्या मास्टरमाईंडनेच इंडिया स्क्रॅपने हा डबल गेल खेळला असल्याची विश्सनीय माहीती आहे.

**शासकीय रूग्णालयातील भंगार घोटाळा**

दरम्यान इंडिया स्क्रॅप मर्चंन्टला हे कंत्राट दिल्यानंतर साहीत्याचे वजन करण्यात आले का? साहीत्य ज्या ट्रकमधुन वाहतुक करण्यात आले त्याचे छायाचित्र तसेच साहीत्याची वाहतुक नियम अटी प्रमाणे करण्यात आली का? असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित झाले असून या सर्व प्रकाराची चौकशी करणे गरजेचे असल्याची मागणी होत आहे.

विशेष म्हणजे शासकिय रुगणालयातील कारभारावर नियंत्रण रहावे यासाठी अशासकिय समिती गठीत करण्यात आलेली आहे. परंतु या समितीने देखील भंगार घोटाळ्यावर चुप्पी साधली आहे.

## संक्षिप्त वृत्त

### आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त उज्वला नागठाणे यांचा नायगांवकरांच्या वतीने अभिनंदन

**नायगांव**-नायगांव तालुक्यातील पुज्य साने गुरुजी विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक बालाजी नागठाणे यांच्या सुविद्य पत्नी सौ. उज्वला बालाजी नागठाणे यांना नुकताच जिल्हा स्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने



माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण , अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ. अनुष्का शर्मा, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मिनल करनवाल यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. आदर्श गुरु गौरव पुरस्कार सोहळ्याला शिक्षणधिकारी डॉ. सविता बिरगे , माधव सलगर , बनसोडे , जिल्ह्यातील शिक्षण विभागातील बिलोलीचे पाटील , नायगांवचे कांबळे, केंद्र प्रमूख , शिक्षण विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक,विठ्ठलराव ताकबिडे, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष बसवदे, अशोक बावने, संजय कोठाळे, दिगांबर मांजरमकर , शिवाजी काहळेकर , व्यंकट भोगाजे , विजय कुऱ्हाडे , सौ .गोदावरी विभुते, (मुख्याध्यापिका) सौ.अर्चना भोगाजे आदी मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती. याबद्दल नायगांव तालुक्यातील मित्र मंडळाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. जिल्ह्याचे माजी शिक्षण सभापती संजयआप्पा बेळगे,जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बाबूराव लंगडापूरे ,सरपंच भगवान पाटील लंगडापूरे, ब्राम्हण महासंघाचे अध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार बाळासाहेब पांडे, भाजपाचे तालुकाध्यक्ष नारायण लंगडापूरे, नागेश कल्याण, शिवानंद स्वामी , संतोष मठदेवरु, शंकरराव लाब्दे .गंगाधरराव पाटील डॉ. विशाल बेंद्रे, भास्कर चव्हाण सह, या मित्र मंडळाच्या वतीने पूज्य साने गुरुजी विद्यामंदिर देगांवचे जेष्ठ शिक्षक बालाजी नागठाणे यांच्या त्या पत्नी .सौ उज्वला बालाजी नागठाणे यांना जिल्हा स्तरीय आदर्श गुरु गौरव पुरस्कार मिळाल्या बद्दल अभिनंदन करुन पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या. तर लोहगांव येथील जिल्हा परिषद हायस्कूलचे मुख्याध्यापक शिवाजी कोंडावार यांनी सौ.उज्वला बालाजी नागठाण यांचा कौंटूबीक सत्कार केला.

### पवना येथील गोशाळा व गोविज्ञान केंद्राचा भूमिपूजन सोहळा संपन्न

**हिमायतनगर**-हिमायतनगर तालुक्यातील दि. ४ ऑक्टोंबर रोजी देव कृपा गोशाळा तथा गोविज्ञान केंद्रचा भुमीपुजन सोहळ्यात मंचावर उपस्थितनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्रात गोहत्या बंद होणार आणि जे जे लोकं असं बेकायदेशीर कृत्य करतील त्यांना त्याची किंमत चुकवावी लागेल. राज्यातील १०६५ गोशाळाआंना लवकरच प्रती गोवंश प्रती दिवस ५०/- रूपये प्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे. यामुळे गोशाळा लवकरच स्वयंपुर्ण होतील, दुसरी यानंतर गोशाळांच्या आर्थिक बळकटीसाठी गोमय मुल्य वर्धन योजना आणुन गोमय व गोमुत्राव्दारे गोशाळांना आर्थिक उत्पन्न मिळवुन दिले जाईल. गोसेवा आयोगाचे किरण बिच्चेवार आणि त्यांच्या गोरक्षकांच्या कार्यात नेहमीच सहभागी होता आणि भविष्यात देखील राहील. किरण बिच्चेवार यांचा अत्याधुनिक शेड बघण्यासाठी आम्ही पुन्हा येणार आहे असे मत व्यक्त केले. आम्ही कोणी पत्यक्ष दिसलो नाही तरीही आम्ही किरण बिच्चेवार सोबतच आहोत- भाऊराव कुदळे, क्षेत्र गोरक्षा प्रमुख, विश्व हिंदु परिषद मुंबई क्षेत्र. अतिशय प्रतीकुल परीस्थितीचा सामना करत शेकडो केसेस करून कसायांना जेरीला आणणाऱ्या बिच्चेवार यांना प्रशासनाने त्रास देण्याचा प्रयत्न केला होता. पण त्या त्या अधिकाऱ्यांना संघटनेच्या ताकदीचा परीणाम भोगावा लागला. यांचे गोरक्षणाचे कार्य अतिशय पारदर्शकपणे ते सर्व शेकडो कार्यकर्त्यांना सोबत घेऊन करतात. परीणाम नांदेड जिल्ह्यात मागील १४ महीन्यात २४८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, एवढे गुन्हे महाराष्ट्रात ईतर कोणत्याही जिल्ह्यात नोंद झालेले नाहीत. कार्यकर्त्यांना सांभाळुन ठेवणे, त्यांच्या अडीअडचणीत मदत करणे हे किरण बिच्चेवार चे कौशल्य आहे, त्यांचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे.

# शासकीय सेवा करीत असताना आई वडिलांचीही सेवा करा: लक्ष्मण देवदे



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, प्रतिनीधी**

मुदखेड शहरातील भूमिपुत्र महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये प्रशासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल त्यांचा दि.६ ऑक्टोंबर रोजी शारदा पेट्रोल पंप नांदेड रोड येथे सत्कार सोहळा कार्यक्रमाचे आयोजन सैनिक फेडरेशन मराठवाडा अध्यक्ष तथा मुदखेड नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष लक्ष्मण देवदे यांच्या वतीने करण्यात आले होते. तसेच या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्ष राज बहादुर कोत्तावार,व प्रमुख पाहुणे म्हणून काँग्रेस कमिटी तालुका अध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, शहराध्यक्ष कैलास गोडसे, यांची उपस्थिती होती. यावेळी निवड झालेल्या पिंटु गुंठे, निलेश बिस्मीले यांच्या सह २२ सत्कारमूर्तीचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी मनोगत व्यक्त करताना लक्ष्मण देवदे म्हणाले की शासकीय सेवा करीत असताना आई-वडिलांची ही सेवा करणे आपले कर्तव्य आहे असे उपस्थित असलेल्या सत्कारमूर्तींना संबोधित करतांना सत्कार सोहळा कार्यक्रमाप्रसंगी बोलताना म्हणाले. यावेळी माजी सैनिक प्रभाकर घोंगडे, राजाराम हाळदे, देविदास पवार, साहेबराव वने, मारोती गुंठे,विकास बलफेवाड, चंद्रकांत तेलंगे, साईनाथ राठोड, सुर्यकांत चौदंते,पत्रकार संजय कोलते, उपेंद्र देवदे, गीरीष कोत्तावार, मुजीब पठाण, ज्ञानेश्वर मगरे, सतीष मुंगल, सचिन चंद्रे, संजय सावंत, शिवा बिस्मिल्ले,राजु चौदंते, राजेशाम ढगे,गजानन संबोड, यांच्यासह प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या उमेदवारांच्या पालकांची व गावातील नागरिकांची उपस्थिती होती.

### अडीच लाखाचे मोबाईलइ जप्त

**नांदेड** - स्थानिक गुन्हा शाखेने तीन आरोपींना पकडून त्यांच्याकडून दोन लाख ३७ हजार रुपयांचे मोबाईल हस्तगत केले आहेत या कारवाईत पोलिसांनी गुलाब राजू प्रधान रा.आंबेडकरनगर नांदेड, अमोल राजू खंदारे रा.विष्णूनगर, शिवा उर्फ शिवम जालिंदर दवणे रा.तेहरानगर यांना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून २ लाख ३७ हजार रुपयांचे १९ मोबाईल हस्तगत केले आहेत.

# बिलोली वन विभाग कार्यालयाच्या गार्डनमध्ये राष्ट्रीय वन्य जीव सप्ताह

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली, दि. ०७ ऑक्टोबर**

नांदेड परिक्षेत्राचे उपवनसंरक्षक केशव वाबळे व सहायक वनसंरक्षक (तेंदू व कॅम्प) भीमसिंह ठाकूर नांदेड तसेच देगलूर वनपरिक्षेत्र अधिकारी निखिल हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र देगलूरमधील वनपरिमंडळ बिलोली वनपर्यटन केंद्र बिलोली या ठिकाणी १ ते ७ ऑक्टोबर दरम्यान वन्यजीव सप्ताह निमित्त वन्यजीव व वनसंरक्षण याबाबत कार्यक्रम घेऊन मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, पूज्य साने गुरुजी विद्यालय, आंतरभारती विद्यालय, विद्यानिकेत मुलींचे हायस्कुल येथील विद्यार्थ्यांकडून निबंध, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमकाढून मुलांना प्रमाणपत्र व भेट वस्तू देण्यात आली, सोबतच बिलोली परिसरातील सर्प मित्र क्रांती बुद्धेवार यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष



मुख्याध्यापिका साबणे, प्रमुख पाहुणे कल्याण गायकवाड, वनरक्षक शिवसांब घोडके यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमास वनपरिमंडळ अधिकारी शंकर गेडाम, शेख फरीद, वनरक्षक ज्ञानेश्वर मुसळे, वनरक्षक नारायण कोरडे, मैनोदिन जाकेर, सय्यद गफूर, शेषेराव इंगळे, सुनिल गायकवाड मारोती शिंदे, प्रकाश कांबळे, मारोती कांबळे शेख रब्बानी आदी उपस्थित होते.

# आ. श्यामसुंदर शिंदे दूरदृष्टीचे लोकनेते: आशाताई शिंदे

**लोहा, दि. ०७ ऑक्टोबर :** लोहा येथे दि. ४ ऑक्टोबर रोजी सामाजिक कार्यकर्त्यां आशाताई श्यामसुंदर शिंदे यांच्या हस्ते लोहा शहर व तालुक्यातील सा. बां. विभाग नांदेड अंतर्गत विविध ९० कोटी रुपये विविध विकास कामांचा उद्घाटन व लोकार्पण सोहळा थाटात संपन्न झाला आहे. लोहा सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालय परिसरात दुपारी जाहिर सभेचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून गंगाधर सावकार सूर्यवंशी, प्रमुख पाहुण्या म्हणून सामाजिक कार्यकर्त्या सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे, लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे अनुजाताई विक्रांत पाटील शिंदे,संचालक तथा चेअरमन से.सो.हाळद रोहित पा शिंदे,तहसीलदार विठ्ठल परळीकर,उपसभापती श्याम अण्णा पवार, उपसभापती अण्णासाहेब पवार, सरपंच पुंडलिक पाटील बोरगावकर,बालाजी इसादकर, इंजि. सोमवंशी, समन्वय समिती सदस्य सिद्धू पाटील वडजे, संचालक विश्वम्भर पवार, भाऊराव कंधारे ,ज्ञानेश्वर पाटील पवार,माजी सरपंच दिगंबर पाटील डिकळ राष्ट्रवादी काँग्रेस चे तालुकाध्यक्ष प्रभाकर पवार,सरपंच बंडू पा मस्किकर,सरपंच मारोती सोनवळे,मा सरपंच शंकर माने संचालक सुधाकर सातपुते,नागेश हिलाल, फयाज शेख, प्रसाद जाधव,सतीश कराळे सह प्रमुख उपस्थिती होते,यावेळी बोलताना आशाताई शिंदे म्हणाल्या की,आमदार श्यामसुंदर शिंदे साहेबांचे स्वप्न आहे की मतदारसंघात सिंचनाची सोय झाली पाहिजे.जगाचा पोशिंदा शेतकरी राजा जगला पाहिजे यासाठी आमदार शिंदे यांनी मतदारसंघात २४ सिंचन तलावला मंजुरी मिळवून आणली आहे, आमदार शिंदे साहेब हे विकासाभिमुख नेत्रत्व असून आमदार साहेबांना दूरदृष्टी असल्यामुळेच लोहा शहरात व कलंबर आणि सावरगाव परिसरात ९० कोटी रुपयाची न भूतो न भविष्य अशी कामे झाली असून मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कदापि कमी पडणार नसून मतदारसंघाला सुजलाम सुफलाम करण्यासाठी आमदार शिंदे कुटुंबीय सदैव कटिबद्ध असल्याचे आशाताई ताई शिंदे यांनी बोलताना सांगितले,यावेळी मोठया संख्येने कार्यकर्ते पदाधिकारी, महिला भगिनीं, अधिकार उपस्थित होते.




# भाविकांनी शांततेत दर्शन घेऊन, मंदीर प्रशासनास सहकार्य करावे:विश्वस्त चंद्रकांत भोपी यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. ०७ ऑक्टोबर**

अश्विन शुद्ध प्रतिपदा ०३ ऑक्टोबर पासून माहूरगडावरील श्री रेणुकादेवी मंदिर संस्थान येथे घटस्थापनेने नवरात्र महोत्सवास सुरुवात झाली असून,१२ ऑक्टोबर विजयादशमी पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवात भाविक भक्तांना देवीच्या दर्शनासाठी मंदीर प्रशासनाच्या वतीने सर्व सोईसुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.नवरात्र काळात देवीच्या दर्शनाची वेळ ही सकाळी ०५ ते रात्री १० अशी वाढवून देण्यात आली असली तरी शेवटच्या भाविकाचे दर्शन होईपर्यंत मंदीर हे उघडे राहणार असल्याने श्री रेणुकादेवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांनी शांततेत मातेच्या दर्शनाचा लाभ घ्यावा आणि मंदीर प्रशासन,महसूल प्रशासन व यात्रा नियोजन करणारे



सर्व संबंधित प्रशासनास सहकार्य करावे! असे नम्र आवाहन श्री रेणुकादेवी संस्थान,माहूरगड, विश्वस्त समितीच्या वतीने विश्वस्त चंद्रकांत भोपी यांनी दै. सोलापूर तरुण भारतला माहिती देताना भाविक भक्तांना केले आहे.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले कि, माहूरगडावरील श्री रेणुकादेवी मंदीर संस्थान येथे घटस्थापनेनंतर कुमारिका पूजनाला अनन्यसाधारण महत्त्व असून, त्यानंतर छबिना मिरवणूक काढली जाते.छबिना म्हणजे परिवार देवतांचे पूजन होय. दरम्यान चतुवेद पारायण, सप्तशती १००पाठ पूर्ण झाल्यानंतर होम हवन केला जातो. चारही वेदांचे पारायण या दिवशी देवीस ऐकविले जाते.यासाठी प्रत्येक वेदाचे दोन दोन गुरुजी नियुक्त केलेले असतात.

सप्तमीला संस्थानच्या वतीने किल्ल्यातील महाकाली देवी गडावर जाऊन देवीला महावस्त्र, महानैवेद्य अर्पण करून पूर्व परंपरेनुसार अष्टमीच्या हवनाची परवानगी मागितली जाते.महापूजा केली जाते.या नवरात्रात सप्तमी आणि अष्टमी दोन्ही योग एकाच दिवशी आलेले आहेत. नवमीच्या दिवशी पूर्णाहूतीने हवनाची सांगता होते. याच दिवशी घटोत्थापन केले जाते. म्हणजे घटाच्या माळा पूर्ण वर उचलल्या जातात.पूर्णाहूती झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी विजयादशमी दसरा संस्थान तर्फे मोठ्या हर्षोल्हासात साजरा केला जातो. यावेळी रेणुकादेवी पूत्र भगवान परशुरामाची वाजतगाजत पालखी दक्षिणेकडील पर्वतावरील वरदायिनी मातेच्या मंदिरात जाते आणि भगवान परशुराम त्या ठिकाणाहून आपटारुपी सोनं घेऊन येतात व मातेस अर्पण करतात. यावेळी पालखीसमोर 'कोहळा' बलिदान केले जाते. यानंतर सुवासिनी महिला भगवान परशुरामाचे औक्षण करतात.परशुरामाची अभिषेक पूजा करून आपटारुपी सोनं मातेला अर्पण करतात. त्यानंतर उपस्थित आप्तस्नेहीयांना सोनं देऊन एकमेकांना दसऱ्याच्या शुभेच्छा देतात.असे सांगताना विश्वस्त चंद्रकांत भोपी म्हणाले कि,खऱ्या अर्थाने कोजागरी पौर्णिमेला या महोत्सवाची सांगता होते.अशीही माहिती विश्वस्त चंद्रकांत भोपी यांनी तरुण भारत शी बोलताना दिली.